# सिद्धयोग्यांचे अनुभव

*२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या रात्री भारतातील गणेशपुरी स्थित सिद्धयोग आश्रम, गुरुदेव सिद्धपीठामध्ये बाबा मुक्तानंदांनी महासमाधी घेतली—आपल्या भौतिक शरीराचा त्याग करून ते ब्रह्मांडीय चेतनेमध्ये विलीन झाले.*

*ऑक्टोबर, १९८२मधील बाबांच्या महासमाधीच्या समयीचे तुमचे अनुभव सांगण्यासाठी कृपया दिलेल्या लिंकवर क्लिक करा.*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या दिवशी, एस. वाय. डी. ए. फाऊंडेशनचे एक स्टाफ सदस्य व मी, न्यूयॉर्कच्या कॅट्स्किल पर्वतरांगांमधून जात होतो आणि आम्ही श्री मुक्तानंद आश्रमापासून फारसे दूर नव्हतो. आम्ही एका छोट्या स्पोर्टस् कारमधून जात होतो. अतिशय सुंदर आणि आल्हाददायक दिवस होता तो. सभोवताली पानगळीचा चमचमणाऱ्या लाल, पिवळा आणि नारिंगी रंगाचा पर्णसंभार पसरला होता.

आश्रमात परतल्यावर आम्ही पाहिले की, ख्रिसमसच्या वेळी लावतात तशा दिव्यांच्या माळा लावण्यात आल्या होत्या. आम्हाला सांगण्यात आले की, बाबांनी महासमाधी घेतली आहे.

त्या दिवशीच्या स्मृती आजदेखील माझ्या मनावर कोरलेल्या आहेत; त्या स्मृती प्रकाश, ओजस्विता आणि बाबांचे रंग यांनी पूरित आहेत. त्या संपूर्ण दिवसभर मला असे भासत होते की, मी बाबांच्या प्रकाशात बुडून गेलो आहे आणि त्यानेच वेढला गेलो आहे.

*मेरीलँड, अमेरिका*

वर्ष १९८२मधील पानगळीचा मोसम सुरू असताना आपले शिक्षण पूर्ण करण्यासाठी मी एका नवीन शहरात आलो होतो. त्याच्या एक वर्ष आधी मला शक्तिपात दीक्षा प्राप्त झाली होती.

उत्साहपूर्ण आणि जोशपूर्ण अशा त्या सिद्धयोग सहयोग्यांपासून दुरावल्यामुळे मी उदास झालो होतो, ज्यांनी सिद्धयोगाचे अभ्यास जाणण्यास, समजण्यास मला मोलाची मदत केली होती. माझी अशी उत्कट इच्छा होती की, नव्या शहरातदेखील मला एक संघम् मिळावा.

२ ऑक्टोबर १९८२च्या सायंकाळी यूनिव्हर्सिटीच्या प्रवेशद्वारावर एका व्यक्तीने माझ्याजवळ येऊन मला विचारले : “तुला योगामध्ये रुची आहे का?” हे ऐकून माझे पाय तिथेच थबकले. मला वाटले की, जणू बाबा मला म्हणत आहेत की, मला नवीन संघम् शोधण्याची गरज नाही, त्याऐवजी मी स्वतःच अशा भक्तांच्या समूहाचा केंद्रबिंदू बनू शकतो. मी जेव्हा घरी परतलो, तेव्हा माझे मन एका नवीन प्रेरणेने, एका नव्या उद्देशाने ओतप्रोत भरले होते. दुसऱ्या दिवशी एका मित्राने मला ही बातमी दिली की, बाबांनी महासमाधी घेतली आहे.

दोन वर्षांनंतर मी माझ्या शहरात राहणाऱ्या एकमात्र सिद्धयोग्याला भेटलो. या शहरात आम्ही फक्त दोघेच सिद्धयोगी होतो, आणि मग आम्ही दोघांनी मिळून एका सिद्धयोग ध्यानकेंद्राची स्थापना केली, जेथे सध्या मी जात असतो. मला जाणवते की, हे केंद्र बाबांच्या आशीर्वादाचेच साकार रूप आहे.

*वीन, ऑस्ट्रिया*

२ ऑक्टोबर १९८२च्या पौर्णिमेच्या संध्याकाळी, मी माझ्या दहा वर्षाच्या मुलीला सांगितले की, बाबांनी आत्ताच देहत्याग केला आहे. माझी मुलगी, जी सात वर्षांची असताना बाबांना भेटली होती, ती अतिशय शांत स्वरात मला म्हणाली, “बाबांचा देहान्त झालेला नाही, ते आता प्रत्येकाच्या हृदयात आहेत.”

*पॅरिस, फ्रान्स*

२ ऑक्टोबर १९८२च्या पौर्णिमेच्या दिवशी मी मेरीलँड इथे होते. मला एक फोन आला आणि मला सांगितले गेले की, बाबांनी देहत्याग केला आहे आणि अनेक लोक भारतात जात आहेत. माझा मुलगा एक वर्षाचा होता आणि मी विदेशयात्रा करू शकत नव्हते. परंतु त्या रात्री माझे आईवडील आलेले होते त्यामुळे मी वॉशिंग्टन डी. सी. येथील सिद्धयोग आश्रमात जाऊ शकले. आश्रमामध्ये "ॐ नमो भगवते मुक्तानंदाय"ची अविरत धून सुरू झाली होती आणि ती काही आठवडे निरंतर सुरू राहणार होती.

कामावरून घरी परत येताना मी रोज आश्रमात जात असे. मी कितीतरी दिवस रडतच होते. एके दिवशी मी भिंतीवर लावलेला बाबांचा फोटो पाहत होते. बाबा एका बेंचवर बसून हसत होते. अचानक मी बाबांना स्पष्ट आवाजात म्हणताना ऐकले की, "मी जिवंत आहे, मी कुठेही गेलेलो नाही. मी माझ्या भक्तांच्या हृदयात प्रवेश केला आहे—मी तुझ्या हृदयात आहे." माझ्या हृदयातून एक गहन जाणीव उद्‌भवली आणि माझ्या संपूर्ण शरीरात पसरली. माझे अश्रू हास्यात बदलले आणि मला हे जाणवले की, बाबा जे म्हणाले होते ते सत्य आहे. मी आजदेखील हे जाणते की, बाबा पूर्णरूपाने माझ्या हृदयात विराजमान आहेत आणि त्या सर्वांच्या हृदयांतदेखील, जे त्यांना जाणतात, जे त्यांच्यावर प्रेम करतात.

*वेस्ट व्हर्जीनिया, अमेरिका*

२ ऑक्टोबर १९८२च्या पौर्णिमेच्या रात्री, मी गुरुदेव सिद्धपीठामध्ये, महिलांच्या डॉर्मिटरीमध्ये झोपले होते. रात्रीच्या समयी, वातावरणात प्रतिध्वनीत होणाऱ्या 'ॐ नमो भगवते नित्यानंदाय' या नामसंकीर्तनाच्या गूढ स्वरांनी मला जागे केले. अचानक दरवाजावर थाप पडली आणि आम्हाला सांगण्यात आले की, आम्ही तयार होऊन, नित्यानंद मंदिरात पोहोचावे आणि संकीर्तन करावे, कारण

बाबांचे स्वास्थ्य ठीक नव्हते. सूर्योदयानंतर ही बातमी देण्यात आली की, बाबांनी महासमाधी घेतली आहे.

त्यानंतर सर्वांना बाबांच्या खोलीत त्यांचे अंतिम दर्शन घेण्यासाठी बोलावण्यात आले. बाबांना भगव्या रंगाचे वस्त्र पांघरून, पद्मासनात बसवले होते. वातावरणात व्यापून राहिलेल्या ऊर्जेचे प्रबळ तरंग इतक्या स्पष्टतेने जाणवत होते की, मला साधे उभे राहणेदेखील अवघड वाटत होते.

माझ्या आश्रमातील वास्तव्यादरम्यान मला बाबांसाठी शिवणकाम करण्याची सेवा दिली गेली होती. मी संयम ठेवण्यास शिकले, त्याचबरोबर मी हेदेखील शिकले की, रेशमी कापडाला एकसारखे आणि छोटे-छोटे टाके घालून ते कशा रीतीने शिवले जाते. या सेवेचे महत्त्व मला तेव्हा समजले, जेव्हा मी बाबांच्या देहावर पांघरलेले भगव्या रंगाचे रेशमी वस्त्र पाहिले.

*ओशन शोर्स, ऑस्ट्रेलिया*

२ ऑक्टोबर १९८२च्या पौर्णिमेच्या दिवशी दुपारी मी माझ्या पतीला आणण्यासाठी विमानतळाच्या दिशेने जात होते, जो वीस मैल दूर होता. सुखद ऊन पडलेले होते. गाडी चालवत असताना मला प्रत्येक ठिकाणी बाबांच्या उपस्थितीची जाणीव होत होती. ते माझ्या चहूबाजूला होते. जिथेजिथे माझी दृष्टी जाई, तिथेतिथे ते पूर्णरूपात विद्यमान होते. मी बाबांप्रतिच्या प्रेमाने भरून गेले होते, आणि मला अथांग आनंदाची अनुभूती झाली.

घरी आल्यावर मला फोनवर ही बातमी कळली की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. माझा आनंद आणि प्रेम वाढू लागले आणि आजही मला बाबांच्या उपस्थितीची अनुभूती होते.

*मेरीलँड, अमेरिका*

२ ऑक्टोबर १९८२च्या पौर्णिमेच्या संध्याकाळी कडक थंडी पडली होती. मी माझ्या मित्राला भेटण्यासाठी त्याच्या घरी गेलो होतो. मी स्वयंपाकघराच्या दरवाजातून आत जाताच, तेथील दोन महिलांनी लगेच मला अभिवादन केले. त्यांचे डोळे पूर्णतः विस्फारलेले होते आणि त्या चिंतेने एकटक माझ्याकडे पाहत होत्या. त्यातील एक महिला मला म्हणाली, “तुम्ही ऐकले नाही का की, आज बाबा मुक्तानंदांनी देहत्याग केला आहे.” मी बाबांचा भक्त आहे हे त्यांना माहीत होते.

या बातमीने मला आश्चर्य तर वाटले, पण त्यामुळे मी थोडासाही उदास झालो नाही, उलट मला तत्क्षणी अनुभूती झाली की, माझा श्रीगुरूंशी गहन आंतरिक संबंध आहे. माझ्या मित्रांना आश्चर्य वाटले की, ही बातमी ऐकल्यावर मला रडू कसे कोसळले नाही; त्यांना याचे दुःख होत होते की, त्यांना अशी बातमी मला द्यावी लागली, कारण त्यांना अशी भीती वाटत होती की, मला खूप दुःख होईल. परंतु तीव्र दुःख होण्याऐवजी मला अशी अनुभूती होत होती की, माझे हृदय विशाल होते आहे आणि आता तर मी बाबांच्या संपर्कात सदैव राहू शकतो आहे. आणि तेव्हापासून असेच झाले आहे.

*कॅलिफोर्निया, अमेरिका*

२ ऑक्टोबर १९८२च्या पौर्णिमेच्या दिवशी मी न्यूयॉर्क शहरातील माझ्या घराकडे जात होते. घरात प्रवेश करणार तोच माझी दृष्टी आकाशातील पौर्णिमेच्या विशाल चंद्राकडे गेली आणि तत्क्षणी, माझ्या मनात असा विचार आला की, माझे भौतिक शरीर ही मला मिळालेली भेट आहे आणि त्या विचाराबरोबरच माझ्या अंतरी कृतज्ञतेचा भाव उत्पन्न झाला. घरात गेल्यावर मी माझ्या पलंगावर आडवी झाले आणि अचानक माझे शरीर ताठर व अचल झाले. माझ्या पलंगाच्या वरील छत निळ्या रंगाच्या आकाशात रूपांतरित झाले, नंतर हे दृश्य मागे सरकले आणि तिथे एक असे स्थान प्रकट झाले जिथे एक सुंदर चेहरा दृग्गोचर झाला. तो मला म्हणाला, “मी तुझ्यावर प्रेम करतो.”

नंतर मला ढगांच्या गडगडाटासारखा आवाज ऐकू आला आणि मला माझ्या पाठीच्या कण्यात उभरणाऱ्या व शांत होणाऱ्या स्पंदनांची जाणीव झाली. माझ्या सहस्रारात मी अनुभवले की, मी ईश्वरीय चेतना आहे. माझ्या पाठीच्या कण्यात उभरणाऱ्या व शांत होणाऱ्या त्या स्पंदनांबरोबरच मला माझ्या पूर्वजन्मांचा अनुभव आला, मनुष्ययोनीच्या रूपातील तसेच इतर अनेक योनींच्या

रूपातीलदेखील. हे सर्व घडत असताना, संपूर्ण वेळ, मला माझे श्रीगुरू बाबा मुक्तानंद यांच्या आनंदमय हास्याचा ध्वनी ऐकू येत होता. मी अनुभवले की, ते म्हणत आहेत, “तुझ्या या सर्व जन्मांमध्ये मी तुझ्यासोबत होतो आणि नेहमीच तुझ्यासोबत राहीन.”

या अनुभवातून मी जेव्हा बाहेर आले आणि पुन्हा हालचाल करू शकले, तेव्हा मी माझ्या शयनकक्षातून बाहेर आले—आणि त्याचवेळी माझ्यासोबत राहणाऱ्या महिलेकडून ही बातमी ऐकली : बाबा मुक्तानंदांनी महासमाधी घेतली आहे.

*न्यूयॉर्क, अमेरिका*

२ ऑक्टोबर १९८२ च्या पौर्णिमेच्या रात्री मला बातमी समजली की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. मी स्तब्ध झाले आणि माझा विश्वासच बसत नव्हता की, माझे श्रीगुरू मला अशा प्रकारे सोडून निघून गेले!

त्या वेळची दुसरी एक गोष्ट जी मला आठवते आहे, ती म्हणजे नामसंकीर्तन. दिवसभरातील पूर्ण मोकळ्या वेळात मी नामसंकीर्तन करीत असे. रोज संध्याकाळी मी आणि इतर सर्व सिद्धयोगी एखाद्याच्या घरी जमत असू आणि संगीतमंडळीसमवेत ‘ॐ नमो भगवते मुक्तानंदाय’च्या संकीर्तनाची दोन किंवा तीन आवर्तने गात असू. सप्ताहाच्या शेवटी आम्ही पॅरिस येथे असलेल्या आश्रमामध्ये महिनाभर चालणाऱ्या नामसंकीर्तनात भाग घेत असू.

मी जेव्हा संकीर्तन गात असे, तेव्हा प्रत्येक वेळी एकाच प्रकारचा चमत्कार होत असे : माझ्या दुःखाचा आणि काहीतरी अत्यंत महत्त्वाचे गमावल्याचा भाव लुप्त होत असे आणि त्या स्थानी एक गहन व उत्साहपूर्ण प्रशांती व्याप्त होत असे. महिन्याच्या शेवटी, मी मधुर तृप्तीच्या आणि प्रेमाच्या त्याच व्यापक स्थितीमध्ये बुडून गेले होते, ज्या स्थितीचा अनुभव मी बाबांच्या सान्निध्यात करत असे. आणि मी हे निश्चितपणे जाणले होते की, माझ्यासोबत ते नेहमी त्या अभ्यासांमध्ये असणार आहेत, जे अभ्यास त्यांनी आपल्याला प्रदान केले आहेत.

*बोवे, फ्रान्स*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या दिवशी, मी फ्रान्सच्या पॅरिसमधील सिद्धयोग आश्रमाचा निवासी व स्टाफ सदस्य होतो. त्या दिवशी रात्रीच्या भोजनानंतर, आम्हाला संकीर्तन हॉलमध्ये सायंकालीन संकीर्तनाच्या नियमित कार्यक्रमासाठी बोलावले गेले.

संकीर्तनादरम्यान, मला अचानक असे वाटू लागले की, माझे शरीर अधिकाधिक जड होत चालले आहे. एक वेळ अशी आली की, माझे शरीर इतके जड झाले की, मी बसूही शकत नव्हतो. संकीर्तनादरम्यान मी हॉलमध्ये आडवा होऊ शकत नव्हतो, म्हणून मी माझ्या खोलीमध्ये गेलो, जेणेकरून मी अंथरूणावर आडवा होऊ शकेन. माझे शरीर इतके जड होते की, मला खूपच विचित्र वाटत होते. मला कळत नव्हते की, मला काय होते आहे; मला तर असे वाटले की, मी आता बिछान्यातच मरणार आहे.

नंतर आश्रमात राहणाऱ्या इतर लोकांकडून मी ऐकले की, बाबांनी गुरुदेव सिद्धपीठात महासमाधी घेतली आहे. त्यावेळी एकदम माझ्या लक्षात आले की, हा बाबांप्रति असलेली माझी भक्ती आणि त्यांच्याशी असलेला माझा दृढ आंतरिक संबंध होता, ज्यामुळे मला असे जाणवले की, माझादेखील त्याच समयी मृत्यू होतो आहे.

*न्यूयॉर्क, अमेरिका*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या दिवशी, बाबांच्या महासमाधीच्या समयी, मी ध्यान करत होते. मला एक दृष्टान्त झाला ज्यामध्ये बाबा मला लाकडाच्या एका छोट्या नावेत माझ्यापाशी दिसले. मी किनाऱ्यावर उभी होते आणि जेव्हा ते किनाऱ्यावर पोहोचले, तेव्हा त्यांनी घाईघाईने सांगितले की, मी नावेत बसावे. काही वेळानंतरच, बाबांनी पुन्हा सूचना देत सांगितले की, मी अगदी आत्ताच,

याच क्षणी नावेत बसावे. मग आम्ही पाण्याच्या सखोल भागाकडे जाऊ लागलो. बाबा समोर बसले होते. जेव्हा ते नाव वल्हवत होते, तेव्हा सर्वकाही शांत व स्थिर होते. लवकरच मी पाहिले की, बाबा तिथे नाहीत आणि मला चिंता वाटू लागली. मग एक संदेश, आंतरिक ज्ञानासमान उदित होऊ लागला—की वास्तवात मी गुरूच आहे आणि सिद्धयोग अभ्यासांनी व उचित प्रयत्नांनी या ज्ञानाचे उन्मीलन होऊ शकते.

*ऑरेगन, अमेरिका*

ऑक्टोबर १९८२मध्ये मी एक स्पष्ट व अनोखे स्वप्न पाहिले, ज्यामध्ये बाबा एका वेदीसमोर उभे होते जी दगडांनी बांधलेल्या एका खूप जुन्या चर्चसमान दिसणाऱ्या इमारतीच्या आत होती. बाबांनी मला सरळ विचारले, “तर, तुझा हा आठवडा कसा गेला? मला जाणून घ्यायचे आहे. तुझा हा आठवडा कसा गेला?”

मला आश्चर्य वाटले व मी काहीच उत्तर दिले नाही आणि मग मी झोपेतून जागा झालो. त्याच दिवशी आमच्या संघम्‌मधील एका सिद्धयोग्याने मला फोन करून सांगितले की, बाबांनी एका आठवड्यापूर्वी महासमाधी घेतली आहे.

*वॉशिंग्टन, अमेरिका*

२ ऑक्टोबर १९८२च्या पौर्णिमेचा दिवस हा श्री मुक्तानंद आश्रमातील एक सुंदर दिवस होता. मी आश्रम प्रबंधक म्हणून सेवा अर्पण करत होतो. दुपारच्या जेवणानंतर मी माझ्या खोलीत परत गेलो. मला खूपच उदास व जडावल्यासारखे वाटत होते. माझी पत्नीदेखील तिथेच होती आणि न जाणो कशामुळे, पण तीदेखील उदास होती. हे अगदीच अस्वाभाविक होते, म्हणून आम्ही असे काही केले

की, जे आम्ही दुपारी कधीच करत नव्हतो—आम्ही आमच्या पूजेच्या खोलीत गेलो व आरती केली. दुपारी २ वाजता मी माझ्या कार्यालयात आलो. आत आल्यावर पाहिले, टेलेक्स मशीनमधून आवाज येत होता. मी जे पाहिले त्यावर माझा विश्वासच बसत नव्हता : "बाबा मुक्तानंदांनी महासमाधी घेतली आहे."

पुढील दोन तास मी टेलेक्स मशीनवर गुरुदेव सिद्धपीठातून अधिक विस्ताराने माहिती घेत राहिलो. शेवटी ४ वाजता सूचना मिळणे बंद झाले. आम्ही बाबांच्या महासमाधीची घोषणा केली आणि 'ॐ नमो भगवते नित्यानंदाय'ची धून सुरू केली. काही वेळानंतरच शब्द आपोआपच 'ॐ नमो भगवते मुक्तानंदाय'मध्ये बदलले आणि ही धून अनेक आठवडे सुरू राहिली.

*कॅलिफोर्निया, अमेरिका*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या दिवशी, मी कॅलिफोर्नियामधील ओकलंडमध्ये माझ्या घरात ध्यान करत होतो. मला एक दृष्टान्त झाला, मी पाहिले की, एका निर्जन काळोख्या जागी मी एकटा आहे आणि घाबरलेल्या स्थितीत आहे. अचानक मी माझ्या डोक्यावर प्रकाशाचे झगमगणारे कण पाहिले आणि माझ्या आजूबाजूला बाबांची उपस्थिती अनुभवली.

जेव्हा मी झगमगणाऱ्या, तेजोमय चमकदार प्रकाशाकडे पाहिले, तेव्हा मी जोराने ओरडलो, "हे तर बाबा आहेत! हे बाबा आहेत!" आणि त्याबरोबरच मी ध्यानातून बाहेर आलो. त्या दिवशी पहिल्यांदाच मी ध्यानात बाबांची उपस्थिती अनुभवली होती!

त्याच दिवशी दुपारी, ओकलंडच्या सिद्धयोग आश्रमाला बातमी मिळाली की, बाबांनी गुरुदेव सिद्धपीठात महासमाधी घेतली आहे. त्या दिवशी सकाळी, ध्यानात आलेल्या अनुभवाने मला सांत्वना मिळाली आणि मला जाणवले की, बाबा सदैव माझ्यासोबत राहतील आणि सर्व वाईट गोष्टींपासून माझा बचाव करतील.

नंतर मला समजले की, त्या दिवशी बाबांनी त्यांच्या अनेक भक्तांना ध्यानात दर्शन दिले होते.

*कॅलिफोर्निया, अमेरिका*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या रात्री मी माझ्या कुटुंबीयांसमवेत गुरुदेव सिद्धपीठात होते. गुरुचौकातून जात असताना मी पाहिले की, बाबा अंधारात बसलेले आहेत आणि गुरुमाई त्यांच्या शेजारी आहेत. मला जाणवले की, ते आमच्याकडे पाहत आहेत. त्यांच्यापाशी जाऊन त्यांना प्रणाम करावा असे मला वाटत होते, पण मग असा विचार आला की, तसे करणे योग्य नाही, म्हणून मी मनातल्या मनात त्यांना प्रणाम केला.

सकाळ होण्यापूर्वीच 'ॐ नमो भगवते नित्यानंदाय'च्या ध्वनीने मी जागी झाले, जो संपूर्ण आश्रमात दुमदुमत होता. काय घडते आहे हे पाहण्यासाठी मी बाहेर गुरुचौकात गेले आणि मला सांगण्यात आले की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. त्यांची शक्ती सर्वत्र जाणवत होती, प्रत्येक स्थानी ती चमचमत होती.

त्या दिवशी नंतर, आश्रमातील प्रत्येकाला बाबांच्या कक्षात जाऊन त्यांचे दर्शन घेण्यासाठी आमंत्रित केले गेले. त्यांना पद्मासनात बसवले गेले होते व त्यांना रेशमी वस्त्रे घातली गेली होती. मला जाणवले की, त्यांची शक्ती आम्हा सर्वांमध्ये व्याप्त होते आहे, जसे बाबा परमचितीमध्ये विलीन झाले, तशी त्यांची शक्ती आमच्यामध्ये समाविष्ट झाली.

आमच्यापैकी प्रत्येकाला बाबांच्या कक्षातील एकएक वस्तू दिली गेली. आजही माझ्यापाशी रत्नांनी मढवलेला तो वाडगा आहे, जो माझ्या पूजास्थानी ठेवलेला आहे. आज मी जेव्हा त्या समयाचे स्मरण करते, तेव्हा मला जाणवते की, बाबांचे आशीर्वाद सदैव माझ्यासोबत आहेत,

*सेंट हेलेन्स, ऑस्ट्रेलिया*

जेव्हा मी अनेक सिद्धयोग्यांचे अनुभव वाचले ज्यांमध्ये त्यांनी वर्णन केले आहे की, महासमाधी घेण्याच्या वेळी बाबा कोणकोणत्या विशिष्ट पद्धतींनी त्यांच्यापाशी आले होते, तेव्हा मला माझा अनुभवही आठवला जो माझ्यासाठी अनपेक्षित होता.

त्यावेळी मी पॅरिसमध्ये राहत होते आणि सिद्धयोग मार्गावर नवीन होते. मला हे माहीत नव्हते की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. तरीदेखील २ ऑक्टोबर, १९८२च्या दिवशी अचानक मला जाणवले की, बाबा माझ्या हृदयात प्रवेश करत आहेत आणि त्यांना माझ्या गुरूंच्या रूपात ओळखण्याचा महान उपहार ते मला देत आहेत. आजदेखील मी नेहमी माझा उजवा हात माझ्या हृदयावर ठेवते, कारण मी जाणते की, बाबा सदैव इथे, माझ्या हृदयात जिवंत आहेत.

कसा कृपापूरित लेप आहे हा! मी बाबांप्रति खूप, खूप कृतज्ञ आहे.

*सटन, कॅनडा*

मला आठवते आहे की, मी माझ्या घरात नेमकी कोणत्या जागी उभी होते जेव्हा २ ऑक्टोबर, १९८२ला मला फोनवर ही बातमी मिळाली की, बाबा मुक्तानंदांनी महासमाधी घेतली आहे. मी निःस्तब्ध झाले होते. आणि मग माझ्या अंतरी कृतज्ञतेचा जणू पूर लोटला होता.

ऑक्टोबर १९७६मध्ये, बाबा द्वितीय विश्वयात्रा संपवून भारतात परतल्याच्या काही काळानंतर मी सिद्धयोग मार्गाचे अनुसरण करू लागले. मी जेव्हा माझ्या घराच्या जवळ असलेल्या सिद्धयोग आश्रमात जायला सुरुवात केली, तेव्हापासून बाबांचे प्रत्यक्ष दर्शन घेण्याची इच्छा माझ्या मनात वाढत गेली. एका वर्षानंतर मी माझ्या पतीसोबत गुरुदेव सिद्धपीठात गेले. जाण्यापूर्वी, मी अशी शपथ घेतली की, बाबांच्या भौतिक सान्निध्याला कधीही साधारण रूपात प्राप्त होणारी वस्तू समजणार नाही, अर्थात त्यांचे सान्निध्य अनमोल आहे असे समजून त्याचा सदैव सन्मान करेन.

मी माझे वचन पूर्ण केले. मी बाबांच्या सान्निध्यात असण्याच्या प्रत्येक क्षणाचे रसास्वादन केले, त्याचा आनंद घेतला. दर्शनादरम्यान बाबांच्या चरणांपाशी बसण्याची आणि दुरून का होईना त्यांच्या

भगव्या वस्त्रांची झलक प्राप्त करण्याची जी-जी संधी मला गवसत असे, तिच्यामध्ये मी स्वतःला निमग्न होऊ देत असे.

अतः जेव्हा मी बाबांच्या देहत्यागाची बातमी ऐकली, तेव्हा मी हे जाणत होते की, मी ते सर्वकाही केले आहे, जे त्यांचा आशीर्वाद मिळवण्यासाठी मी करू शकत होते. बाबांप्रति मी अनंत कृतज्ञता अनुभवत होते. आणि त्या क्षणी, मी अनुभवले की, बाबांनी नेहमीसाठी माझ्या हृदयात प्रवेश केला आहे.

*मिशीगन, अमेरिका*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या रात्री, आम्हाला फोनवर ही बातमी मिळाली की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. माझ्या पतीने काही कारणास्तव आपले पाकीट उघडले आणि पहिली गोष्ट त्यांना जी दिसली, ती होती बाबांचा एक फोटो, ज्याखाली लिहिले होते, “लक्षात ठेव, मी सदैव तुझ्यासोबत आहे.” माझ्या पतीने त्यांच्या जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत या गोष्टीवरील विश्वास कायम ठेवला.

*इलिनॉए, अमेरिका*

२ ऑक्टोबर, १९८२ची पौर्णिमेची रात्र, मला सदैव एका अत्यंत विशेष, पवित्र व मंगलमय रात्रीच्या रूपात आठवते. माझ्या आईवडलांनी बाबांचा एक फोटो पॅसेजमध्ये लावला होता आणि दररोज रात्री वरच्या मजल्यावर माझ्या खोलीत झोपायला जाताना मी बाबांकडे पाहत असे आणि मनातल्या मनात त्यांना “शुभ रात्री” म्हणत असे. १९८२च्या त्या रात्री मी पाहिले की, बाबा माझ्याकडे पाहून खरोखरच हसत आहेत, मी खरोखरच त्यांच्या ओठांवर हास्य पाहिले. मला झोप

येत होती, म्हणून मी माझे डोळे चोळले आणि पुन्हा पाहिले—बाबा पुन्हा हसले. “अरे वा!”—मी विचार केला आणि आश्चर्यचकित होऊन, हृदयात आनंदाचा आणि मधुरतेचा अनुभव घेत मी झोपायला गेले.

दुसऱ्या दिवशी अगदी सकाळीच फोनची रिंग वाजली आणि बातमी मिळाली की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. त्यावेळी मी युवती होते. त्यानंतर गेल्या एकोणचाळीस वर्षांपासून, श्रीगुरुमाई माझ्या गुरू आहेत आणि माझ्या जीवनात बाबांची सूक्ष्म उपस्थिती सदैव विद्यमान आहे.

*फार्नबरो, यूनायटेड किंगडम*

२ ऑक्टोबर १९८२च्या पौर्णिमेच्या दिवशी मी गुरुदेव सिद्धपीठ येथे सेवा अर्पित करीत होते. त्या आधी माझा जन्मदिवस साजरा करण्यासाठी मी गुरुचौकात बाबांच्या दर्शनासाठी म्हणून गेले होते. मला बाबांपाशी येऊन बसण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आणि तेव्हा मी ऐकले की, बाबा मला सांगत आहेत की मी त्यांच्या चरणांकडे पाहावे. मी जेव्हा त्यांच्या त्या चमकणाऱ्या रंगीत पायमोज्यांकडे लक्षपूर्वक पाहिले, तेव्हा मला असा अनुभव आला की, मी त्यांच्या आनंदात विलीन होते आहे. त्याच वेळी बाबा एकदम उठले आणि हॉलच्या बाहेर निघून गेले.

त्या रात्री मी जेव्हा झोपायला गेले, तेव्हा स्वप्नामध्ये मला दिसले की, बाबा मला मोरपंखांनी हळुवार स्पर्श करत आहेत, माझ्यामध्ये शक्तीचा संचार करत आहेत. आणि ते मला श्रीगुरुगीतेचा ३२वा श्लोक ऐकवत आहेत, ज्यामध्ये म्हटले आहे की, “गुरूच ब्रह्म आहेत, गुरूच विष्णू आहेत, गुरूच भगवान शिव आहेत, गुरूच साक्षात परब्रह्म आहेत. अशा श्रीगुरूंना नमस्कार असो.” हे अद्‌भुत स्वप्न पाहत असतानाच मी एका झटक्यात जागी झाले, कारण कोणीतरी येऊन मला सांगत होते की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. मला ही गोष्ट खरी वाटलीच नाही, माझा या गोष्टीवर तोवर विश्वास बसला नाही, जोपर्यंत मी स्वतः गुरुचौकात जाऊन अनेक भक्तांना प्रेमवश एकमेकांच्या गळ्यात गळा घालून रडताना पाहिले नाही.

*मॅसेच्यूसेट्स्, अमेरिका*

२ ऑक्टोबर १९८२च्या पौर्णिमेच्या दिवशी, संकीर्तन, ध्यान व बाबांचे स्मरण करण्यासाठी एकत्र जमलेल्या सिद्धयोग्यांसह झालेल्या एका अनौपचारिक कार्यक्रमात मी भाग घेतला. त्यानंतर जेव्हा आम्ही बसून वार्तालाप करत होतो, तेव्हा चर्चा मुख्यतः या मुद्यावर होत होती की, आम्हा सर्वांना बाबांची आठवण येते आहे, आम्हा सर्वांना त्यांची अनुपस्थिती जाणवते आहे आणि आता आम्ही त्यांच्या सान्निध्यात पुन्हा कधीही राहू शकणार नाही.

यानंतर काही मिनिटांनीच मला जाणवले की, आतादेखील बाबा माझ्या हृदयात तसेच विद्यमान आहेत, जसे त्या दिवशी होते जेव्हा मला शक्तिपात मिळाला होता. मी परत आनंदित झाले की, आता मला त्यांना शोधायला कधीही कुठे जावे लागणार नाही—त्यांच्या सान्निध्यात असण्यासाठी मला आता फक्त माझ्या अंतरी डोकावून पाहावे लागेल!

*यूटाह, अमेरिका*

ऑक्टोबर १९८२च्या एका अत्यंत आल्हाददायक दिवशी मी केंब्रिजमधील सिद्धयोग ध्यानकेंद्रामध्ये श्रीगुरुगीतेच्या साप्ताहिक स्वाध्यायात भाग घेतला. सत्संगानंतर आम्ही बराच वेळ बाबा व आमच्या साधनेविषयी बोलत होतो. प्रत्येकजण म्हणत होता की, आजचा सत्संग किती आनंदपूर्ण व शक्तिपूर्ण होता.

त्याच दिवशी नंतर मला माझ्या एका मित्राकडून कळले की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. आघाताच्या याच स्थितीत मी गुरुदेव सिद्धपीठात जाण्याचा निश्चय केला. मी काही आठवड्यांनंतर तिथे पोहोचले. दर्शनाच्या वेळी श्रीगुरुमाईंच्या निकट बसलेली असताना मी अनुभवले की, बाबांनी आपल्या असीम करुणेने आपल्याला श्रीगुरुमाईंच्या कृपाछायेत सोपवले आहे. माझे दुःख थोडे कमी झाले, माझ्या मनाला सांत्वना मिळाली. तेव्हापासून मी अनुभवते आहे की, मी पूर्णपणे सुरक्षित

आहे आणि माझी काळजी घेतली जाते आहे आणि मी जाणते की, बाबांनी माझी साथ कधीच सोडलेली नाही.

*सँडगेट, ऑस्ट्रेलिया*

२ ऑक्टोबर १९८२च्या पौर्णिमेच्या दिवशी, मी श्री मुक्तानंद आश्रमामध्ये सेवा अर्पित करीत होते. पानगळीच्या मोसमातील तो एक मनोरम दिवस होता. दुपारच्या जेवणानंतर मी माझ्या खोलीत आराम करण्यासाठी गेले. साधारण एक वाजण्याच्या सुमारास माझ्या हृदयात तीव्र वेदना होऊ लागल्या. माझ्या मनात तर असादेखील विचार येऊन गेला की, "हृदयविकाराच्या वेदना काहीशा अशाच असतील."

खोलीत आराम केल्यावर सेवा करण्याच्या उद्देशाने मी पुन्हा आश्रमात आले आणि पाहिले की, लॉबीमध्ये कोणीतरी रडते आहे. त्यांनी मला ध्यानाच्या हॉलमध्ये जाऊन संकीर्तन करण्यास सांगितले—कारण बाबांनी देहत्याग केला होता! नंतर मी जेव्हा न्यूयॉर्क व भारत यांच्या वेळांमधील अंतर पाहिले, तेव्हा मला असे आढळून आले की, माझ्या हृदयात वेदना होण्याची वेळ आणि भारतात बाबांनी महासमाधी घेण्याची वेळ जवळजवळ एकच होती.

मी 'हे जाणले' की, बाबांनी मला कळवले होते—थेट माझ्या हृदयामध्ये—आणि ते स्थान त्यांनी कधीच सोडले नाही.

*मेन, अमेरिका*

२ ऑक्टोबर १९८२च्या पौर्णिमेच्या त्या रात्री, जेव्हा बाबांनी महासमाधी घेतली, तेव्हा मी गुरुदेव सिद्धपीठात होतो. त्यानंतर श्रीगुरुमाई जेव्हा सर्वांना संबोधित करत होत्या, तेव्हा त्यांनी अत्यंत प्रेमाने माझ्याकडे पाहिले आणि मला जाणवले की, विजेप्रमाणे शक्तीने माझ्या वक्षस्थळी प्रवेश केला

आहे. मी झटका बसल्यासारखा थोडासा मागे वाकलो आणि माझे हृदय द्रवित झाले. या शक्तीने ओतप्रोत होऊन मी जेव्हा उभा होतो, तेव्हा माझ्या आतून हे शब्द बाहेर पडले : “सर्व काही ठीक आहे, मी ठीक आहे. बाबा निघून गेले आहेत, परंतु सर्वकाही ठीक आहे. आम्ही सर्व ठीक आहोत.” मी स्वतःला पूर्णतया सुरक्षित असल्याचे अनुभवले; मला जाणवले की, आपण सर्व त्यांच्या सुरक्षाकवचाने वेढलेले आहोत.

दोन दिवसांनंतर, मी जेव्हा गुरुचौकात गेलो, तेव्हा माझी दृष्टी बाबांच्या आसनाकडे गेली. मी स्तब्ध होऊन रस्त्यातच उभा राहिलो, आश्चर्याने माझे तोंड उघडेच राहिले. बाबा गुरुचौकातून आपल्या खोलीकडे जात होते. भलेही त्यांची पाठ माझ्याकडे होती, पण त्यांना ओळखण्यात माझ्याकडून चूक झाली नव्हती. आपल्या आसनापर्यंत जाऊन ते जेव्हा वळले, तेव्हा मी पाहिले की, त्या गुरुमाई आहेत. मी मनातल्या मनात बाबांना म्हणालो, “तुम्ही कुठेही गेला नाहीत, खरे आहे ना?”

बाबा आजदेखील माझ्यासोबत आहेत, आपल्या सर्वांसोबत आहेत आणि अजूनदेखील वेळोवेळी मला त्यांचे दर्शन होत असते.

*बुसेल्टन, ऑस्ट्रेलिया*

३ ऑक्टोबर १९८२ रोजी आम्ही आमच्या स्थानिक सिद्धयोग ध्यानकेंद्रावर होणाऱ्या नियमित सत्संगात भाग घेत होतो. तोपयत आम्ही बाबांच्या महासमाधीविषयी काहीच ऐकले नव्हते, परंतु माझ्या लक्षात एक गोष्ट आली होती की, मला त्या आनंदाची अनुभूती होत नव्हती जशी बहुधा मला नेहमीच्या सत्संगामध्ये होत असे. सत्संगानंतर माझ्या एका मित्राने मला सांगितले की, आकाशवाणी [रेडिओ]वर सायंकाळी साधारण ५.३० वाजता बाबांच्या महासमाधीची बातमी प्रसारित झाली आहे. आम्ही लगेच गणेशपुरीकडे रवाना झालो आणि सकाळी साधारण ७ वाजता आश्रमात पोहोचलो.

गुरुदेव सिद्धपीठात प्रवेश केल्यावर मला जाणवले की, पूर्ण आश्रम जणू काही ध्यानाच्या अवस्थेमध्ये आहे. संपूर्ण वातावरण, दिव्य स्पंदनांनी व्याप्त होते आणि मी तेथील कणाकणात शक्तीची अनुभूती करत होतो. गणेशपुरीमधील बडे बाबांच्या समाधिमंदिरापर्यंतची बाबांची अंतिम यात्रा तसेच

समाधी देण्यापर्यंतचे समस्त संस्कारविधी अविस्मरणीय आहेत. आजदेखील मला बाबांच्या समाधीमंदिरात त्यांच्या शक्तीचा अनुभव होतो. एका मानवासाठी जी सर्वोच्च प्राप्ती आहे, त्या मार्गावर मला मार्गदर्शन करण्यासाठी मी बाबांचा अत्यंत कृतज्ञ आहे.

*गणेशपुरी, भारत*

मला साधनेला सुरुवात करून दोन वर्षे झाली होती आणि मी श्रीगुरुगीतेच्या साप्ताहिक पठणासाठी सूत्रधाराच्या सेवेची तयारी माझ्या घरी करत होते. त्याचवेळी एका साधकाने येऊन सांगितले की, बाबांनी महासमाधी घेतली आहे.

त्या वेळी मी एवढे तर जाणत होते की, सिद्धयोग हा माझा मार्ग आहे, परंतु माझ्या जीवनात गुरू असण्याचा काय अर्थ आहे, याविषयीचे माझे ज्ञान व समज सीमित होती. तरीदेखील त्या क्षणी, आपण काहीतरी गमावल्याची जी भावना मी अनुभवली, ती अतिशय कष्टदायक होती.

श्रीगुरुगीतेचा पाठ करत असताना, मला माझ्या अंतरी रितेपणाची भावना जाणवू लागली. रितेपणाची ही जाणीव खूप मोठी होती! असे वाटत होते की, जणू काही मी माझे आईवडील, माझा भाऊ, माझे पती, माझा घनिष्ठ मित्र आणि खूप काही गमावून बसले आहे. नंतर ते रितेपण, अत्यधिक विस्तृत, सर्वव्यापी प्रेमाने भरू लागले— असे प्रेम की, ज्याला ना आदि आहे ना अंत आहे. मी निःसंशयपणे हे जाणले की, बाबांना मी कधीच गमावू शकत नाही. भलेही ते निघून गेले आहेत, परंतु त्यांची उपस्थिती सदैव त्या प्रेमसागरात प्राप्त होऊ शकते, ज्याची अनुभूती मी स्वतःच्या अंतरी करत होते.

*वेस्ट मोलसी, यूनायटेड किंगडम*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या दिवशी मी श्री मुक्तानंद आश्रमामध्ये गुरुसेवा अर्पित करत होतो. त्या रात्री मी जेव्हा बाहेर एकटा बसलेला होतो, तेव्हा मी पाहिले की चंद्र असाधारणपणे

अतिशय मोठा आणि तेजोमय प्रतीत होतो आहे. मी तिथे बसून चंद्राला जेव्हा न्याहाळत होतो, तेव्हा मला जाणवले की, माझ्या अंतरी असाधारण, अद्वितीय आणि प्रेममय शक्तीच्या लाटांवर लाटा उसळत आहेत. त्या तटावर धडकणाऱ्या समुद्राच्या सौम्य लाटांप्रमाणे होत्या आणि प्रत्येक लाट मधुरातिमधुर, सर्वाधिक प्रेमयुक्त शक्तीने ओतप्रोत होती. त्यांचा अनुभव विशुद्ध प्रेमाप्रमाणे होता आणि मी निःसंदेहपणे हे जाणले होते की, हे बाबाच आहेत. या अनुभवाने मला बाबांप्रति गहन भक्तीच्या आणि प्रेमाच्या अवस्थेत लीन केले आणि हे प्रेम अधिकाधिक शक्तिपूरित व दृढ होत गेले.

काही वेळाने मी आश्रमात परतलो—तिथे मला प्रत्येक जण निराळ्याच रूपात दिसत होता. ज्या पहिल्या व्यक्तीला मी याविषयी विचारले, ती म्हणाली, “तुम्ही ऐकले नाही का? बाबांनी नुकतीच महासमाधी घेतली आहे!" आश्चर्यकारक गोष्ट ही होती की, ही बातमी ऐकून मला जरासादेखील धक्का बसला नाही. मी अजूनही प्रेमयुक्त शक्तीच्या त्या लाटांनी वेढलेला होतो. बाबांच्या प्रेमाची ही अनुभूती माझ्या मनात बराच काळ कायम होती—मला हे आश्वासन देत होती की, बाबा आताही माझ्यासोबत आहेत.

*कॅलिफोर्निया, अमेरिका*

२ ऑक्टोबर १९८२च्या पौर्णिमेच्या रात्री मी सत्संगासाठी पॅरिस [साँतुआँ]च्या सिद्धयोग आश्रमात होते. मी घरी परतताच मला आश्रमाच्या व्यवस्थापकाचा फोन आला. त्यांनी सांगितले की, बाबांनी देहत्याग केला आहे आणि आश्रमात संकीर्तनास आरंभ झाला आहे. माझे मन शून्य झाले आणि मी लगेच आश्रमात परत गेले.

मला आठवते, नामसंकीर्तन एक महिनाभर बंद झाले नव्हते, कारण की पॅरिसमधील निरनिराळ्या सिद्धयोग ध्यानकेंद्रांमध्ये जवळजवळ दररोज नामसंकीर्तन होत होते. मला उदास वाटत नव्हते, कारण मला नामसंकीर्तनामध्ये बाबांच्या उपस्थितीचा अनुभव होत होता. त्या कठीण प्रसंगातून बाहेर पडण्यासाठी नामसंकीर्तनाने मला मदत केली.

तेव्हापासून, माझे जीवन व साधना सुरू आहे, परंतु बाबा माझ्या हृदयात सदैव विद्यमान आहेत. मी बाबांप्रति अत्यंत कृतज्ञ आहे की, त्यांनी मला शक्तिपात प्रदान केला. मी श्रीगुरुमाईंप्रति अत्यंत कृतज्ञ आहे की, तेव्हापासून आजपर्यंत त्या मला मार्गदर्शन आणि संरक्षण प्रदान करत आल्या आहेत.

*नॉयसिल, फ्रान्स*

१९७८ मध्ये मी बाबांना ओकलंडमध्ये भेटले होते आणि त्यानंतर काही दिवसांनीच मला त्यांच्या तिसऱ्या विश्वयात्रेत त्यांच्यासमवेत जाण्याचे सौभाग्य प्राप्त झाले. त्यानंतर पुढील काही वर्षे मी बाबांना आत्म्याविषयी अतिशय सुंदर रीतीने बोलताना ऐकले होते, परंतु मला असे वाटले की, ना मला कधी आत्मानुभूती झाली आहे आणि ना कधी मला खोलवर समजले आहे की, बाबा कशाविषयी बोलत आहेत.

मग २ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या रात्री बाबांनी जेव्हा महासमाधी घेतली, तेव्हा मी गुरुदेव सिद्धपीठामध्ये सेवा अर्पण करत होते. दुसऱ्या दिवशी सकाळी श्रीगुरुमाई आश्रमात उपस्थित आम्हा सर्वांशी बोलल्या. मी त्यांना सांगताना ऐकले की, बाबांनी त्यांना असे सांगितले आहे की, गुरुमाईंनी आम्हा सर्वांना असे सांगावे की, बाबा आपल्याला सोडून गेलेले नाहीत तर त्यांनी आपल्या सर्वांच्या हृदयात नेहमीसाठी प्रवेश केला आहे. मी लगेचच अनुभवले की, माझे हृदय अत्यंत सुंदर, झगमगणाऱ्या शक्तीने तसेच मधुर प्रेमाने भरून गेले आहे. तत्क्षणी मी हे जाणले की, ही शक्ती, बाबाच आहेत *आणि* माझा अंतरात्मादेखील.

हा अनुभव सदैव माझ्यासोबत आहे. धन्यवाद, माझे प्रिय बाबा.

*कॅलिफोर्निया, अमेरिका*

बाबांच्या महासमाधीच्या काही आठवड्यांनंतर माझा मुलगा, जो एक ऑटिस्टिक बालक आहे, [एक मानसिक स्थिती जिच्यात व्यक्ती स्वतःमध्येच हरवलेली असते, तिचा मानसिक व सामाजिक विकास पूर्णपणे होऊ शकत नाही] तो माझा हात पकडून मला त्याच्या खोलीत लावलेल्या श्रीगुरुमाईंच्या फोटोजवळ घेऊन गेला. त्याने त्यांच्याकडे बोट दाखवत म्हटले, “बाबा!” मी त्याला समजावले, “नाही, हे बाबा नाहीत, ह्या गुरुमाई आहेत.” असे दोन वर्षे सुरू राहिले आणि मी त्याला संयमपूर्वक समजावत राहिलो की, कोणता फोटो बाबांचा आहे आणि कोणता गुरुमाईंचा.

मग एके दिवशी, नेहमीप्रमाणे त्याने गुरुमाईंकडे बोट दाखवत म्हटले, “बाबा!” अचानक जणू काही एक पडदा दूर झाला. माझे डोळे अश्रूंनी भरले आणि मी म्हटले, “हो, हे बाबा आहेत!” त्याला समाधान वाटले की, अखेरीस मला कळले आहे आणि त्यानंतर त्याने कधीच मला ही गोष्ट सांगितली नाही.

*कॅलिफोर्निया, अमेरिका*

मला जेव्हा फोनवर बाबांच्या महासमाधीची बातमी मिळाली, तेव्हा जणू काही माझे जगच बदलून गेले. मला असे जाणवत असे की, बाबा सदैव माझ्यासोबतच आहेत. जसे की, ‘गुरुदेव हमारा प्यारा,’ या भजनात सांगितले गेले आहे, श्रीगुरूच तर माझ्या जीवनाचा आधार होते. मी विचार करत होतो, “आता मी काय करावे?” मला एकटेपणा जाणवत होता.

मग मला माझ्या अंतरातून एक आवाज ऐकायला आला, “आता तू प्रगल्भ आहेस, तुला कळेल की, तुला काय करायचे आहे.” मी माझ्या अंतरी या आश्वासनाची दृढता व सामर्थ्य अनुभवले आणि माझ्या लक्षात आले की, बाबांनी मला ते दिले आहे ज्याची मला गरज होती.

*कॅलिफोर्निया, अमेरिका*

ऑक्टोबर १९८२मध्ये मी टेक्सासमध्ये राहत होते. बाबांनी महासमाधी घेण्यापूर्वीच्या रात्री मला त्यांची खूप आठवण येत होती आणि मला त्यांच्या सान्निध्यात असण्याची तीव्र इच्छा होत होती. त्यांनी मला जी टोपी दिली होती, ती मी रात्रभर माझ्या हृदयाशी धरून ठेवली. दुसऱ्या दिवशी ही बातमी ऐकून मी खूपच उदास झाले. मी संकीर्तन करण्यासाठी ध्यानाच्या हॉलमध्ये गेले आणि दोन दिवस तिथेच राहिले. दोन दिवसांनंतर कोणीतरी मला एक टॉफी दिली. ती अगदी तशीच होती, जशी बाबांनी मला तेव्हा दिली होती, जेव्हा मी बाबांचे शेवटच्या वेळी दर्शन घेतले होते. मला असे वाटले की, जणू काही बाबाच मला टॉफी देत आहेत आणि म्हणत आहेत की, आता पुन्हा सामान्य जीवन सुरू करण्याचा समय आला आहे.

*फ्लोरिडा, अमेरिका*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या रात्री, मी गुरुदेव सिद्धपीठात सेवा अर्पण करत होतो. मी आधी कधीही स्वतःला विचारले नव्हते, “मृत्यू काय *आहे* ?” तरीदेखील जेव्हा मी त्यांचे अंतिम दर्शन घेण्यासाठी त्यांच्या खोलीत गेलो, तेव्हा माझ्या मनात हा प्रश्न पुन्हापुन्हा उद्‌भवत होता. जेव्हा मी त्यांचे दर्शन घेतले, तेव्हा माझ्या मनात हा बोध उदित झाला, “त्यांचा मृत्यू झालेला नाही—ते जिवंत आहेत!”

बाबांच्या खोलीतून बाहेर आल्यावर मला आश्चर्य वाटले की, बाबा माझ्या हृदयात माझ्याशी अत्यंत प्रेमाने बोलत आहेत. आणि जेव्हा मी गुरुदेव सिद्धपीठाच्या बगिच्यांमध्ये फिरत होतो, तेव्हा तर हे अगदी स्पष्ट झाले की, बाबा सर्वत्र आहेत आणि अशा प्रकारे ते त्यांच्या समाधीमंदिरात व माझ्या हृदयातदेखील सदैव वास करतील.

*रोडज़, फ्रान्स*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या दिवशी, मी सकाळी लवकर उठले आणि लगेच श्रीगुरुगीता पाठ करण्यासाठी ओकलंड येथील सिद्धयोग आश्रमात जाण्याविषयी विचार करू लागले. त्यावेळी माझी मुले, एका नातेवाईकाकडे गेलेली होती. यद्यपि आश्रमात जाण्यासाठी मला एक चुंबकीय ओढ जाणवत होती, तरीदेखील मी ठरवले की, मी इतक्या लवकर घरून निघणार नाही. उलट असा विचार करून की, मुले दुसऱ्या दिवशी घरी येणार आहेत, मी घरातील इतर कामे करायला सुरुवात केली.

काही वेळानंतर एका मित्राने फोनवर सांगितले की, स्वामी मुक्तानंदांनी महासमाधी घेतली आहे. मला जाणवले की मी भाग्यवान आहे, मी लगेच आश्रमात जाऊ शकते आणि बाबांच्या सन्मानार्थ अनेक दिवस चालणाऱ्या संकीर्तनात सहभागी होऊ शकते.

त्या दिवसापासून ते आजपर्यंत, बाबा सदैव माझ्यासोबत आहेत, माझ्या स्वप्नांमध्ये, माझ्या पूजेमध्ये, त्यांची पुस्तके वाचताना किंवा सिद्धयोग कोर्समध्ये भाग घेत असताना. आईची आणि आजीची माझी भूमिका पार पाडताना ते मला मार्गदर्शन करतात. बाबांच्या मार्गदर्शनामुळेच मी शांतिपूर्वक व दृढतेने प्रपंचातील कार्ये करू शकते आणि माझ्या कर्तव्यांचे पालन करू शकते.

*कॅलिफोर्निया, अमेरिका*

जेव्हाजेव्हा मी पौर्णिमेच्या रात्री आकाशाकडे पाहते, तेव्हा मला वर्ष १९८२च्या त्या रात्रीचे स्मरण होते, जेव्हा बाबांनी महासमाधी घेतली होती. त्या रात्री, गुरुदेव सिद्धपीठात माझ्या खोलीत झोपायला जाण्यापूर्वी, मी पौर्णिमेचा चंद्र न्याहाळत होते. मध्यरात्रीच कोणीतरी खोलीचा दरवाजा ठोठावला आणि सांगितले, "बाबांनी महासमाधी घेतली आहे! दर्शनासाठी त्यांच्या खोलीत या."

मला खात्री आहे की, बाबा त्यांचा महासमाधी घेण्याचा समय व दिवस जाणत होते, कारण आदल्या रात्रीच त्यांनी आम्हाला म्हणजे ऑफिसच्या काही सेवाकर्त्यांना एकत्र बोलावून सांगितले होते की, आम्ही सर्वांनी मिळूनमिसळून कार्य करायला हवे. त्या वेळी जे संस्कारविधी झाले होते, ते अजूनही

मला आठवतात. गुरुदेव सिद्धपीठ सोडून मला तीस वर्षे जरी झाली असली, तरीदेखील माझे हृदय, माझ्या श्रीगुरूंसोबतच आहे.

*न्यूयॉर्क, अमेरिका*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या दिवशी, मी माझ्या कुटुंबीयांसमवेत ओकलंडमध्ये राहत असताना मला माझ्या एका मैत्रिणीचा फोन आला. त्याने सांगितले की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. मी निःस्तब्ध झाले आणि रडू लागले. मला बाबांकडून खूप काही मिळाले आहे; मी जाणत होते की, मी स्वतःला सावरू शकेन. परंतु माझा मुलगा जो गंभीर रूपाने अपंग होता, तो बाबांवर खूप प्रेम करत असे आणि त्यांच्याशी खूप जवळीक अनुभवत असे. मी माझ्या पतीला विचारले, “याचे काय होईल?”

मग मला आदल्या रात्री पाहिलेल्या स्वप्नाची आठवण झाली, ज्यामध्ये मी स्वतःला गुरुदेव सिद्धपीठात पाहिले होते. त्या दृश्यात मी खिडकीतून बाहेर गुरुचौकाकडे पाहत होते. गुरुमाई तिथून जात होत्या. त्यांनी वळून माझ्याकडे पाहत माझ्या मुलाविषयी विचारले, “तो कसा आहे?” मला आश्चर्य वाटले की, त्या अगदी त्याच प्रकारे विचारत होत्या जसे बाबा विचारत असत.

मी काहीसे असे उत्तर दिले, “ठीक-ठीक आहे.” गुरुमाईंनी माझ्याकडे पाहिले आणि त्या म्हणाल्या, “चिंता करू नकोस. आता तो माझ्या संरक्षणात आहे.” त्यांचे असे म्हणणे मला विचित्र वाटले, कारण त्याची काळजी तर नेहमी बाबाच घेत असत. दुसऱ्या दिवशी दुपारी मला त्या स्वप्नाची आठवण झाली, तेव्हा माझ्या लक्षात आले. त्यामुळे मला अत्यधिक धीर मिळाला.

*कॅलिफोर्निया, अमेरिका*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या दिवशी अगदी सकाळी मला मॅनहॅटनच्या सिद्धयोग आश्रमाच्या प्रभारी स्वामीजींनी फोनवर सांगितले की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. सुरुवातीला मला असे वाटले की, मी खूप काही गमावले आहे, पण जसजसा काळ गेला, तसतसे माझे मन सतत बाबांवर केंद्रित राहू लागले आणि त्यामुळे मला शांतीची व प्रेमाची आंतरिक अनुभूती होऊ लागली.

मी जेव्हा ऐकले की, आश्रमात एक महिना निरंतर संकीर्तन होणार आहे, तेव्हा मी ठरवले की, मी दररोज संध्याकाळी तिथे जाऊन संकीर्तनात सहभागी होईन, जरी माझे घर आश्रमापासून ४५ मिनिटांच्या अंतरावर आहे, तरीदेखील. 'ॐ नमो भगवते मुक्तानंदाय'चे संकीर्तन गाताना मी जाणले की, ही एक अलौकिक नामधुन आहे.

तो अनुभव सदैव माझ्या मनात व हृदयात राहील. त्या वर्षानंतर प्रत्येक ऑक्टोबर महिन्यात मला बाबांच्या प्रकाशावर त्याच प्रकारच्या केंद्रणाचा अनुभव येतो आणि तो मला शांतीच्या व प्रेमाच्या महान भावाने व्यापून टाकतो.

*फ्लोरिडा, अमेरिका*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या रात्री मी यूनिव्हर्सिटीच्या काही विद्यार्थ्यांना घेऊन रात्रभर सुरू राहणाऱ्या एका आध्यात्मिक यात्रेवर जात होते. आमचे गंतव्यस्थान, एक स्थानिक मठ होता जिथे पोहोचण्याचा रस्ता जंगलांमधून व शेतांमधून जात होता. आम्ही संध्याकाळी उशिरा आमची पदयात्रा सुरू केली आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजता मठात पोहोचलो. पहाटेच्या वेळी, आम्ही जेव्हा मौन रूपाने प्रार्थना करत जात होतो, तेव्हा आकाशात अनेक उल्का पाहून आम्हाला खूप आनंद झाला.

त्या दिवशी घरी परतल्यावर मला बाबांच्या महाप्रयाणाची बातमी कळली. माझ्या घरातील सर्वजण रडत होते, मग ते सिद्धयोग विद्यार्थी असोत वा नसोत. माझ्या प्रगाढ दुःखामध्ये मला गहन कृतज्ञतेचादेखील अनुभव आला की, बाबांच्या महाविलयाच्या पावन समयी मी जागृतावस्थेत होते, निसर्गाच्या सान्निध्यात होते आणि प्रार्थनेत लीन होते.

त्या रात्रीचा अनुभव मी बाबांच्या पुण्य प्रसादाच्या रूपात घेतला आणि मला खात्री आहे की, ज्या उल्का आम्ही पाहिल्या होत्या, त्या बाबांच्या ओजस्वी, पावन जीवनाचा उत्सव साजरा करण्यासाठी व त्याचा सन्मान करण्यासाठीच होत्या.

*न्यूयॉर्क, अमेरिका*

बाबांच्या महासमाधीनंतर काही दिवसांनी मी त्यांच्या समाधीमंदिरात गेले. बाबांना जिथे समाधी दिली गेली होती, त्या मातीच्या चबुतऱ्याच्या जितक्या जवळ बसता येईल, तितक्या जवळ बसले. मी खूपच उदास होते, पण त्याबरोबरच मला तिथे असल्याचा आनंददेखील होता.

काही क्षणांनंतर, मला अगदी माझ्यासमोर एक सोनेरी पाय दिसला. मी हळूच वर पाहिले. बाबा अगदी माझ्यासमोर एका खुर्चीवर बसलेले होते. एक गुडघा दुसऱ्या गुडघ्यावर ठेवून, ते त्याच स्थितीत बसले होते जिच्यात ते नेहमी बसत असत.

मी निःस्तब्ध होऊन गेले. माझ्या त्याच चिरपरिचित पद्धतीने त्यांच्याशी बोलताना मी म्हटले, “पण बाबा तुम्ही तर देहत्याग केला आहे!” बाबांनी माझ्याकडे पाहिले आणि आपला हात उंचावत माझ्याकडे संकेत करत माझे नाव उच्चारले. ते इतक्या जोराने हसत होते की, त्यांचा संपूर्ण हात हलत होता. त्यांच्या संपूर्ण शरीरातून प्रकाश व अतीव आनंद प्रस्फुटित होत होता.

मी विरोध दर्शवला : “यात हसण्यासारखे काय आहे! तुम्ही पुन्हा मला एकटे सोडले आहे!”

बाबा त्याच कोमलतेने व करुणेने हसत राहिले. आणि माझ्या लक्षात आले की, ते खरोखरच माझ्यासोबत आणि त्यांच्या सर्व शिष्यांसोबत आहेत.

*कॅलॅक दी ब्रिटनि, फ्रान्स*

वर्ष १९८२मध्ये मी श्री मुक्तानंद आश्रमात राहत होते. २ ऑक्टोबरच्या दुपारी आम्हाला त्या हॉलमध्ये बोलावले गेले, जिथे भगवान नित्यानंदांची मूर्ती स्थापित आहे. आम्हाला सांगण्यात आले की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. आम्ही सर्वजण स्तब्ध झालो. राग झिंझोटीमध्ये 'ॐ नमो भगवते नित्यानंदाय'ची धून सुरू झाली आणि दोन आठवडे निरंतर सुरू राहिली. एक वेळ अशी आली की, जेव्हा संकीर्तनाचे शब्द 'ॐ नमो भगवते मुक्तानंदाय'मध्ये बदलले. पहिल्यांदाच आम्ही केवळ बाबांच्या नामाचे संकीर्तन केले.

संकीर्तन संपूर्ण आश्रमात दुमदुमत होते. शक्ती असीम होती. बाबांचे निवासस्थान उघडण्यात आले आणि आश्रमवासी दिवसरात्र तिथे ध्यान करू लागले होते. मी एका खोलीत बसले आणि एकाच वेळी अत्यंत तीव्र दुःख आणि आनंद या दोन्ही भावनांनी भरून गेले होते.

जेव्हा मी बाबांच्या महाप्रयाणाच्या वास्तविकतेचा स्वीकार करण्याचा प्रयत्न करत होते, तेव्हा श्रीगुरुमाईंचे सांत्वनपर शब्द गुरुदेव सिद्धपीठातून निरंतर प्रसारित केले जात होते. त्यांच्या शब्दांमध्ये निहित शक्तीने व करुणेने मला आश्वस्त केले की, बाबांनी आम्हाला अशा एका महान विभूतीच्या संरक्षक छत्राच्या सुपूर्द केले आहे ज्यांच्यावर मी विश्वास ठेऊ शकते की, या पृथ्वीतलावरील माझ्या उर्वरित जीवनकाळात त्या मला मार्गदर्शन करतील.

*न्यूयॉर्क, अमेरिका*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या रात्री जेव्हा बाबांनी महासमाधी घेतली होती, तेव्हा मी गुरुदेव सिद्धपीठात होतो. त्या रात्री, ज्या खोलीत मी राहत होतो, तिथे कोणीतरी येऊन सांगितले की, प्रत्येकाला मंदिरात जाऊन संकीर्तनात सहभागी व्हायचे आहे, कारण बाबांची तब्येत ठीक नाही.

आमच्यापैकी काही लोक जेव्हा मंदिरात पोहोचले, तेव्हा मंदिर पूर्णपणे भरलेले होते. म्हणून आम्ही संकीर्तनासाठी बाबांच्या खोलीच्या समोर गुरुचौकात गेलो. त्यानंतर लगेचच बाबांच्या खोलीतून एक व्यक्ती बाहेर आली. मी विचारले की, काय झाले आहे? त्या व्यक्तीने उत्तर दिले, "बाबांनी महासमाधी घेतली आहे!" मला धक्का बसला. मी तिथेच बसलो आणि रडू लागलो.

मग अचानकच, एक महिला बाबांच्या खोलीतून बाहेर आली आणि तिने हाताने आम्हाला आत येण्याचा इशारा केला. मी बाबांच्या देहासमोर बसलो; त्यांचे डोळे किंचित उघडे होते आणि मला जाणवले की, ते जिवंत आहेत. मला माझ्या अंतरी एक आवाज ऐकू येऊ लागला जो वारंवार सांगत होता, “गुरू देह नाहीत. गुरू देह नाहीत.

बाबांच्या या अंतिम दर्शनामुळे आणि त्यांच्याकडून मिळालेल्या या शिकवणीमुळे मला जाणवले की, मी खूप भाग्यवान आहे.

*फ्लोरिडा, अमेरिका*

बाबांनी महासमाधी घेण्याच्या एक आठवडा आधी, मी स्वप्न पाहिले की, मी एका हॉलमध्ये आहे आणि एक शानदार पियानो माझ्यापाशी ठेवलेला आहे. बाबा येऊन एका बाकावर बसतात. मला पियानो वाजवल्याचा आवाज ऐकू येऊ लागतो आणि शब्दांविनाच ते संगीत माझ्या हृदयाशी संवाद साधू लागते. स्वरांच्या माध्यमातून बाबा मला सांगतात की, ते जात आहेत. मी रडत त्यांना म्हणते की, मी तुमच्याविना राहू शकत नाही. संगीत वाजत राहते आणि पुन्हा एकदा बाबा संगीताच्या माध्यमातून मला सांगतात की, मला ते सदैव संगीतात गवसतील.

एका आठवड्यानंतर मी बार्सिलोनाच्या सिद्धयोग आश्रमातील ध्यानाच्या हॉलमध्ये ज्ञानेश्वर महाराजांशी संबंधित एका नाटकाचा पूर्वाभ्यास करत होते—त्याच वेळी एक स्वामी जी आले आणि त्यांनी आम्हाला सांगितले की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. मी ते ऐकताच मला असे जाणवले की, जणू काही मी एका विशाल, अनंत आकाशात उडते आहे जे कालातीत आहे—जे सर्व गोष्टींपेक्षा अगदी वेगळे आहे.

एकच गोष्ट जी मला योग्य वाटत होती, ती म्हणजे मंत्रधुनचा आधार घेणे. हार्मोनियमपाशी जाऊन मी ‘ॐ नमः शिवाय’ वाजवायला सुरुवात केली. हळूहळू हॉलमध्ये उपस्थित असलेले सर्व लोक माझ्यासमवेत गाऊ लागले. नंतर आम्हाला समजले की, विश्वभरातील सिद्धयोग आश्रम तसेच ध्यानकेंद्रे निरंतर ‘ॐ नमो भगवते मुक्तानंदाय’चे संकीर्तन करत आहेत.

मी बाबांप्रति अत्यंत कृतज्ञ होते की, त्यांनी स्वप्नात येऊन मला सांगितले की, मी संकीर्तनाच्या माध्यमातून सदैव त्यांच्यासोबत राहू शकते.

*न्यूयॉर्क, अमेरिका*

वर्ष १९८२मध्ये मी गुरुदेव सिद्धपीठाच्या गोशाळेत सेवा अर्पण करत होतो. बाबा दररोज सकाळी आणि संध्याकाळी गायींना चारा खावू घालण्यासाठी व त्यांच्या पाठीवर हात फिरवण्यासाठी तिथे येत असत. महासमाधी घेण्याआधी, त्या सायंकाळी बाबा लवकर आले होते; त्यांनी काही गायींना चारा खावू घातला आणि इतर गायींविषयी विचारपूस केली.

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या त्या रात्री, एका मित्राने येऊन मला सांगितले की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. मला धक्काच बसला, पण मी घाईने उठलो आणि गोशाळेत गेलो. एक अन्य व्यक्ती गाईंचे दूध काढत होती आणि मी मौन होऊन सफाई करत होतो. आमचे काम संपल्यावर मी अन्नपूर्णामध्ये दूध पोहोचवण्यासाठी रात्रीच बाहेर पडलो. मी तेजस्वी पूर्णचंद्राकडे पाहिले आणि मला रडायला येऊ लागले. अन्नपूर्णाच्या निकट पोहोचताच माझे रडणे थांबले आणि मी दुधाचे कॅन रिकामे करण्यासाठी आत गेलो. मी पुन्हा गोशाळेच्या दिशेने जाऊ लागलो आणि मला पुन्हा रडायला येऊ लागले. गोशाळेत पोहोचताच माझे रडणे थांबले आणि मला जाणवले की, माझे रुदन संपले आहे आणि मला आता आणखी रडण्याची आवश्यकता नाही.

मला प्रफुल्लतेची, चेतनेची व आनंदाची अनुभूती झाली. मला जाणवले की, बाबांनी त्यांच्या प्रेममयी उपस्थितीने मला वेढून टाकले आहे.

*पर्थ, ऑस्ट्रेलिया*

किती अविस्मरणीय दिवस होता तो. मला फोनद्वारे संदेश मिळाला की, बाबांनी महासमाधी घेतली आहे आणि आम्ही संकीर्तन करण्यासाठी स्थानिक सिद्धयोग ध्यानकेंद्रात एकत्र येणार आहोत. ही बातमी ऐकून माझे मन स्तब्ध झाले; ध्यानकेंद्रात जाण्यासाठी तयार होईपर्यंत आणि तिथे पोहोचेपर्यंत माझे मन तसेच स्तब्ध राहिले. केंद्रातील संपूर्ण वातावरणदेखील स्तब्ध होते, शक्ती इतकी प्रखर होती की, ती स्पष्टपणे जाणवत होती. केंद्रात एकत्रित झालेले लोक प्रेमाने मौनामध्ये एकमेकांना भेटत होते; हे स्पष्ट होते की, सर्वांना एकमेकांच्या भावना समजत होत्या.

'ॐ नमो भगवते मुक्तानंदाय' गात-गात मी त्याच्या वर्णांमध्ये हरवून गेले आणि मला जाणवले की, माझ्या अंतरी बाबांची उपस्थिती आणि त्यांचे प्रेम वाढतच चालले आहे.

माझ्या मनाच्या एका छोट्याशा कोपऱ्यात एक विचार येत होता, "दुःखाच्या या स्थितीत मला रडायला का येत नाही; दुःख कुठे आहे?"

हे अशक्य वाटत होते, पण दुःखाऐवजी मी स्वतःला अविश्वसनीयरीत्या बाबांच्या प्रेमाने परिपूर्ण असल्याचे अनुभवत होते आणि असेही अनुभवत होते की, बाबांनी जे सांगितले होते ते खरे आहे—त्यांनी देहत्याग केला आहे पण ते त्यांच्या शिष्यांच्या हृदयात पूर्णपणे प्रविष्ट झाले आहेत.

*ॲरिझोना, अमेरिका*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या रात्री, जेव्हा बाबांनी महासमाधी घेतली, तेव्हा मी तिथेच होतो. मी जून महिन्यापासून गुरुदेव सिद्धपीठात राहत होतो. सुरुवातीला मला खूप धक्का बसला आणि मी उदास झालो. माझे बाबा निघून गेले होते आणि आता भौतिक रूपाने त्यांच्यासमवेत न राहू शकण्याचा विचार अतिशय कष्टप्रद होता. त्यांचे दिव्य स्वरूप माझ्यासाठी किती अनमोल होते!

तरीदेखील, जसजसे त्यांच्या नामाचे संकीर्तन पूर्ण आश्रमाच्या परिसरात निरंतर व्याप्त होत होते, तसतशी त्यांची शक्तीदेखील स्पष्टपणे जाणवत होती. वातावरण प्रसन्नतेने व्याप्त होऊ लागले होते. असे वाटले की, जणू आम्हाला आमच्या दुःखांच्या पलीकडे नेले जाते आहे—त्यांच्या प्रेमाने आम्हाला धरून ठेवले होते, आम्हाला धीर दिला होता आणि आम्ही असे अनुभवत होतो की, ते

अगदी आमच्यासोबतच आहेत. दूरूनदूरून व आजूबाजूच्या स्थानांहून भक्तांचे येणे सुरू झाले होते. मी पाहू शकत होतो की, त्या भक्तांच्या चेहऱ्यांवरील दुःखाचे व उदासीचे भाव शांतीमध्ये व संतुष्टतेमध्ये बदलत होते, कारण तेदेखील याच प्रेमात निमग्न होत होते.

माझ्यासाठी परमोच्च क्षण तो होता, जेव्हा मला सांगण्यात आले की, एके दिवशी पहाटे मला बाबांच्या देहाकडे लक्ष ठेवायचे आहे. तिथे बाबा आणि मी, दोघेच होतो. एका क्षणी तर असे वाटले की, जणू बाबा तिथेच आहेत, त्यांच्या भौतिक देहाच्या किंचित वरच्या स्तरावर विचरण करत आहेत आणि अव्यक्त शब्दांमध्ये मला सांगत आहेत, "बघ, मी इथेच आहे. मी कधी गेलोच नाही."

*वॉशिंग्टन, अमेरिका*

१ ऑक्टोबर, १९८२ला श्रीगुरुगीतेच्या पठणानंतर, मी गुरुदेव सिद्धपीठाच्या वरच्या गच्चीत गेले. सकाळ होत असल्याने, आश्रमाच्या चहूबाजूच्या तानसा खोऱ्यात अत्यंत मनमोहक जांभळ्या रंगाचे धुके पसरले होते. असे मी याआधी कधीही पाहिले नव्हते. मला हे माहीत नव्हते की, ही सर्वाधिक सुंदर सकाळ म्हणजे या पृथ्वीतलावरील बाबांच्या जीवनाचा अंतिम दिवस आहे.

२ ऑक्टोबरच्या अगदी सकाळी कोणीतरी माझा दरवाजा ठोठावला आणि सांगितले की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. मी ध्यानाच्या हॉलमध्ये गेले, जिथे त्यांना समाधी देण्याची तयारी सुरू होती. नंतर आम्हाला सर्वांना बाबांच्या खोलीत येण्यास सांगण्यात आले. मी खूप वेळ तिथे बसून राहिले, मला माझ्या अंतरी पूर्णपणे शांती जाणवत होती. पूर्वी जो ध्यानकक्ष होता, तिथेच काही दिवसांनंतर बाबांना समाधी देण्यात आली; तोच ध्यानकक्ष सध्या बाबांचे समाधीमंदिर आहे. त्या दिवसांचे वर्णन मी अशा प्रकारे करेन—उदासीपासून ते उल्लासापर्यंतचा काळ. मला असे वाटलेच नाही की, बाबा निघून गेले आहेत; मला माझ्या अंतरी त्यांची उपस्थिती आणखी अधिक प्रबळतेने जाणवत होती आणि आजदेखील जाणवते.

*न्यूयॉर्क, अमेरिका*

२ ऑक्टोबर, १९८२चा तो दिवस मी कधीही विसरणार नाही. माझ्या भावाने श्री मुक्तानंद आश्रमातून मला फोन केला आणि ही बातमी सांगितली. माझे कुटुंब माझ्यासोबतच होते. जे ऐकले, त्यामुळे निःस्तब्ध होऊन आम्ही तिथेच बसून राहिलो. कळतच नव्हते की, काय करावे किंवा या बातमीवर विश्वास तरी कसा ठेवावा.

त्याच क्षणी, कोणीतरी दरवाजा ठोठावला. मी दरवाजा उघडला, एक भारतीय व्यक्ती तिथे उभी होती. ती व्यक्ती घरोघरी जाऊन वेदांवरील पुस्तके विकत होती. माझे डोळे अश्रूंनी भरलेले होते, मी त्या व्यक्तीला सांगितले की, आमच्या परमप्रिय श्रीगुरूंनी आत्ताच महासमाधी घेतली आहे. त्या व्यक्तीने अतिशय करुणेने माझ्याकडे पाहिले आणि विचारले की, ते आत येऊ शकतात का?

ती व्यक्ती आमच्या हार्मोनियमपाशी बसली आणि आम्हाला दिलासा देण्यासाठी हार्मोनियम वाजवत तिने भजन गायला सुरुवात केली. त्या व्यक्तीने आम्हाला त्या भजनाचा अर्थदेखील समजावून सांगितला की, जेव्हा एखादे महापुरुष देहत्याग करतात, तेव्हा वास्तवात ते कुठेही जात नाहीत, तर त्यांच्या भक्तांच्या हृदयामध्ये प्रविष्ट होतात. त्या व्यक्तीचे शब्द अतिशय सांत्वना देणारे आणि प्रेममय होते.

मी त्यापूर्वी किंवा आजपावेतो कोणाच्याही घरोघरी जाऊन वेदांची पुस्तके विकणाऱ्या व्यक्तीविषयी कधीही ऐकले नाही. हा वास्तवात बाबांनी दिलेला उपहार होता जेणेकरून आमच्या शोकसमयी आम्हाला आधार मिळावा आणि ज्या समयी आम्हाला त्यांची इतकी कमतरता जाणवत होती, त्या समयी आम्हाला दिलासा व आधार मिळावा.

*कॅलिफोर्निया, अमेरिका*

महासमाधी घेण्याच्या काही महिने आधी बाबा नेहमी आश्रमाच्या भिन्नभिन्न स्थानी जाऊन लोकांशी संभाषण करताना दिसत असत. ते प्रबंधकांशी बोलत, दर्शन देत किंवा त्यांच्या गोल्फ कार्टमध्ये मुलांसमवेत फिरत असत.

सायंकाळी, बाबा ध्यानगुफेत जात, त्या लोकांना आशीर्वाद देत, जे तिथे त्यांच्या शक्तीसमवेत ध्यान करत असत.

आपल्या त्या अंतिम महिन्यांमध्ये बाबा स्वतःला पूर्णपणे समर्पित करत आहेत हे पाहणे अत्यंत अद्‌भुत होते. मला असे जाणवले की, जणू काही बाबा स्वतःचा वेळ अजिबात वाया घालवू इच्छित नव्हते, ते त्यांच्या प्रत्येक क्षणाचा सदुपयोग करत होते जसे की, त्यांच्याकडे जितका वेळ शिल्लक होता त्याचा उपयोग ते इतरांप्रति स्वतःला जास्तीत जास्त देण्यासाठी करत होते.

*टेक्सास, अमेरिका*

वर्ष १९८१च्या पानगळीच्या मोसमादरम्यान, मेक्सिको शहरात स्थित असलेल्या आश्रमात असताना मी स्वप्नात पाहिले की, बाबांचा देहान्त झाला आहे. अश्रूपूरित डोळ्यांनी आणि मी सर्वकाही गमावले आहे या अत्यंत कष्टप्रद दुःखासह मी जागी झाले. असे दुःख मी याआधी कधीही अनुभवले नव्हते. त्याच दिवशी मी बाबांसोबत राहण्यासाठी भारतात जाण्याचे ठरवले. मी मार्च १९८२मध्ये भारतात आले.

२ ऑक्टोबरच्या पौर्णिमेच्या संध्याकाळी मी सायंकालीन नामसंकीर्तनात गेले; एक व्हिडिओ दाखवला जात होता ज्यात बाबा त्या दिवसाचे स्मरण करत होते जेव्हा भगवान नित्यानंदांनी देहत्याग केला होता. बाबा आपल्या खोलीच्या बाहेर अंधारात बसलेले होते. माझ्या खोलीत परत जाताना मी थांबले आणि बराच वेळ चंद्राकडे पाहत राहिले. मी माझ्या अंतरी अतीव परिपूर्णता आणि संतुष्टता अनुभवत होते.

त्याच रात्री मला समजले की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. मी रडू लागले आणि अनेक तास रडत राहिले, रडतच राहिले. ही बातमी जसजशी पसरत गेली, तसतसे शेकडो लोक बाबांच्या

अंतिम दर्शनासाठी येऊ लागले. आश्रमात महिन्याभराचे नामसंकीर्तन आयोजित केले गेले होते आणि यानेच मला सावरले. मला जाणवले की, ज्या अद्भुत शक्तीला बाबांनी माझ्या अंतरी जागृत केले होते, ती आतादेखील माझ्यासमवेत आहे आणि मला मार्गदर्शित करते आहे. आणि आता, श्रीगुरुमाईंच्या सान्निध्यात माझे ज्ञान व माझी परिपक्वता निरंतर विकसित होत आहेत.

*न्यूयॉर्क, अमेरिका*

बाबांनी महासमाधी घेण्याआधी दुपारी घोषणा करण्यात आली की, बाबांचे दर्शन होईल; मला खूपच आश्चर्य वाटले कारण ही घोषणा गुरुचौकात सतारीची एकच तार वाजवून उच्च आणि असाधारण स्वरात केली गेली होती. माझ्यासाठी हे दर्शनासाठी अनिवार्यपणे उपस्थित राहण्याच्या आज्ञेसमान होते. मी जेव्हा बाबांच्या समोर जाऊन उभा राहिलो—जी त्यांच्यासमक्ष जाण्याची अंतिम संधी होती—तेव्हा ते माझ्याकडे पाहून इतक्या स्नेहाने, इतक्या प्रेमाने, इतक्या आपुलकीने आणि इतक्या मित्रतेने हसले, की मी याआधी कधीही असे अनुभवले नव्हते; त्यांनी अत्यंत मधुर गहन स्वरामध्ये माझे स्वागत केले, त्यांचा असा स्वर मी याआधी कधीच ऐकला नव्हता. त्यांच्यातून जे प्रेम माझ्या अंतरी प्रवाहित होत होते, ते इतके प्रबळ होते की, मी उभा राहू शकत नव्हतो आणि मी तिथेच त्यांच्या खुर्चीजवळ बसलो. त्या क्षणी मी त्यांच्या ज्ञानात व प्रेमात लीन झालो होतो, मी तिथेच बसून राहिलो; कदाचित एका क्षणासाठीच बसू शकलो असेन, त्याच वेळी हॉल मॉनीटरने मला पुढे जाण्यास सांगितले.

इतक्या वर्षांनंतर, माझा तो अनुभव अजूनही माझ्यासोबत कायम आहे. जेव्हाजेव्हा मला बाबांपासून दूर असण्याची किंवा सीमित असण्याची जाणीव होते, तेव्हातेव्हा मी त्या क्षणाचे स्मरण करतो. आणि ते स्मरण केल्यानंतर मी ज्या प्रकारे पुन्हा माझ्या पूर्वस्थितीत येतो, ते विलक्षण असते. मला या महापुरुषाचे सान्निध्य प्राप्त झाले, यासाठीची माझी कृतज्ञता पुन्हा नवीन होते.

*फ्लोरिडा, अमेरिका*

ऑगस्ट १९८२मध्ये मी पाच दिवस गणेशपुरीत व्यतीत केले होते. मी बाबांना पहिल्यांदाच भेटले होते. त्या वेळी, मी गुरूंविषयी काहीच जाणत नव्हते, तरीदेखील त्या पाच दिवसांमध्ये मी अनुभवले की, बाबा खरोखर विशेष आहेत, त्यांच्यापाशी असे ज्ञान व शक्ती आहे, जी माझ्या अनुभवापेक्षाही खूप अधिक आहे.

२ ऑक्टोबरच्या पौर्णिमेच्या रात्री मी पॅरिसच्या माझ्या स्टुडिओमध्ये काम करत होते, त्यावेळी अचानकच मला जाणवले की, प्रेमाचा एक प्रचंड तरंग माझ्या अंतरी उतरतो आहे आणि त्या तरंगाने मला पूर्णपणे त्याच्यात सामावून घेतले आहे. त्या क्षणी, मी संपूर्ण खात्रीने असे अनुभवले की, बाबांनी स्वतःला माझ्या अंतरी नेहमीसाठी प्रतिष्ठापित केले आहे. मला कळून चुकले की, ते माझे श्रीगुरू आहेत. त्यानंतर, पॅरिसच्या सिद्धयोग ध्यानकेंद्रात मला समजले की, त्या दिवशी बाबांनी देहत्याग केला आहे. किती अद्‌भुत आशीर्वाद होता तो!

आज मला श्रीगुरूंच्या त्या करुणेची आठवण येते, जिचा वर्षाव अशा एका व्यक्तीवर केला गेला होता, जी त्या समयी सिद्धांच्या जीवनाविषयी तसेच त्यांच्या महानतेविषयी पूर्णतः अनभिज्ञ होती. आज मी बाबांना प्रणाम करते आणि गहन कृतज्ञतेसह त्यांच्या जीवनाचा, त्यांच्या उपहाराचा उत्सव साजरा करते. मी त्यांच्या प्रेमाला तसेच त्यांच्या वारश्याला नमन करते, जो श्रीगुरुमाईंच्या उपस्थितीच्या व त्यांच्या शिकवणींच्या माध्यमातून माझ्या जीवनाचा केंद्रबिंदू बनला आहे.

*सटन [क्यूबेक], कॅनडा*

२ ऑक्टोबरच्या पौर्णिमेच्या रात्री मी ह्यूस्टनच्या सिद्धयोग आश्रमात होते. जेव्हा आम्ही बाबांच्या महासमाधीची बातमी ऐकली, तेव्हा मी शोकाकुल झाले. आदल्या दिवशी रात्री मला बाबांची खूप आठवण येत होती आणि त्यांना खूप भेटावेसे वाटत होते. मी संकीर्तनासाठी ध्यानकक्षात गेले आणि दोन दिवस बाहेर येऊ शकले नाही, ना झोपण्यासाठी आणि ना जेवणासाठी. हॉलमध्ये संकीर्तन करताना मला असे जाणवत होते की, जणू काही मी बाबांच्या देहात आहे.

त्यानंतर माझ्या प्रिय बहिणीने भारतात जाण्यासाठी विमानाचे तिकीट पाठवले. मी जेव्हा गुरुदेव सिद्धपीठात पोहोचले, तेव्हा तिथल्या वातावरणात एक प्रचंड शक्ती व्याप्त होती. भक्तांमध्ये प्रेम तसेच एकमेकांची काळजी घेण्याची भावना खूपच प्रबळ होती. आम्ही आमच्या परमप्रिय बाबांना गमावले होते, तरीदेखील आम्ही त्यांना गमावले नव्हते. त्यांची उपस्थिती स्पष्ट व वास्तविक होती, त्या हवेपेक्षाही अधिक वास्तविक जिच्यात आम्ही श्वास घेत होतो आणि त्या सूर्यापेक्षाही अधिक वास्तविक ज्याला आम्ही आमच्या त्वचेवर अनुभवत होतो. बाबा पूर्वीप्रमाणेच त्या वेळीदेखील आमच्यासमवेत होते, आजदेखील आहेत आणि—सदैव राहतील.

*फ्लोरिडा, अमेरिका*

भारतात बाबा मुक्तानंदांच्या सान्निध्यात नऊ महीने व्यतीत केल्यानंतर, १९८२च्या पानगळीच्या मोसमादरम्यान, मी सहा महिन्यांपासून लॉस एंजेलिसमध्ये राहत होते. मला बाबांची तसेच आश्रमजीवनाची खूप आठवण येत होती.

२ ऑक्टोबरच्या पौर्णिमेच्या सकाळी, मला बातमी कळली की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. म्हणून मी लगेचच सँटा मोनिकाच्या सिद्धयोग आश्रमात जाण्यासाठी निघाले, तिथे तीस दिवसांसाठी नामसंकीर्तन सप्ताह सुरू होता. त्या महिन्यात मी सेवा अर्पित करण्यात तसेच सप्ताहात संकीर्तन करण्यात माझ्या रात्री व्यतीत केल्या. दिव्य शक्ती प्रत्यक्षात अनुभवास येत होती, जिने आश्रमाला स्वर्ग बनवले होते. बाबांचे प्रेम, पूर्णपणे विद्यमान होते आणि तेदेखील *आमच्यासमवेत* संकीर्तन करत होते.

तिसरा आठवडा येता-येता, माझा आत्मा एक असे जीवन जगण्याच्या महान उत्कंठेने भरून गेला जे आध्यात्मिक साधनेप्रति *पूर्णपणे* समर्पित असेल. म्हणून मी आश्रम स्टाफमध्ये एखाद्या उपलब्ध रिक्त सेवास्थानी सेवा अर्पण करण्याच्या इच्छेने अर्ज केला. शक्तिपात मिळण्याच्या तिसऱ्या वर्धापनदिनी मला स्टाफ म्हणून पूर्णवेळ सेवेसाठी स्वीकृती मिळाली! हा बाबांकडून माझ्यासाठी एक प्रेमपूर्ण उपहार होता—हे माझ्या गहनतम प्रार्थनेचे उत्तर होते. माझ्या आध्यात्मिक यात्रेवर केंद्रण करण्याची आणि गुरुमाईंचे मार्गदर्शन व त्यांचे दर्शन प्राप्त करण्याची ही एक दुर्लभ व असामान्य संधी होती.

*कॅलिफोर्निया, अमेरिका*

१ ऑक्टोबर, १९८२ला मी कामावरून परतल्यावर माझी कार पार्क केली. थोड्या वेळानंतर दुसऱ्या एका कामानिमित्त कारकडे येत होते, तेव्हा उदित होणाऱ्या चंद्राला पाहून मी अवाक झाले आणि त्याच्याकडे पाहतच राहिले. या आधी मी असा चंद्र कधीही पाहिला नव्हता, तो सर्वात मोठा, सर्वात उज्ज्वल आणि सर्वात मनमोहक चंद्र होता. मी इतकी मंत्रमुग्ध झाले की, मी गुडघ्यांवर तिथेच बसले व त्याला प्रणाम केला.

२ ऑक्टोबरच्या सकाळी मी ऐकले की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. तेव्हा मला समजले की, गेल्या रात्री चंद्र इतका तेजोमय व अलौकिक का होता. निसर्ग या असाधारण घटनेची—एका महापुरुषाने ब्रह्मांडीय चेतनेत विलीन होण्याची—अभिस्वीकृती देत होता.

मी बाबांप्रति अत्यंत कृतज्ञ आहे, त्यांच्या महिमामय जीवनासाठी तसेच शक्तिपाताच्या अनमोल महाप्रसादासाठी जो त्यांनी मुक्तहस्ते व उदार हृदयाने सर्वांना प्रदान केला.

*न्यूयॉर्क, अमेरिका*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या रात्री माझ्या आईवडलांच्या घरात आम्ही साप्ताहिक सत्संग करत होतो. संकीर्तनादरम्यान मला काहीतरी पडल्याचा आवाज ऐकू आला; मी जेव्हा डोळे उघडले, तेव्हा पाहिले की, हॉलच्या मागच्या भागात बाबांचा एक फोटो भिंतीवरून खाली पडला आहे. एका व्यक्तीने तो उचलून पुन्हा हॉलच्या मागच्या भागात असलेल्या पूजास्थानी ठेवला. मग आम्ही आनंदमस्तीने व अत्यंत भावमुग्ध होऊन संकीर्तनाचा व ध्यानाचा आनंद लुटला.

त्या काळी आम्ही ध्यानानंतर सत्संगाचे आमचे अनुभव एकमेकांना सांगत असू. माझ्या वडलांनी सांगितले की, ध्यानाच्या समयी त्यांना बाहेर पाऊस सुरू झाल्याचा आवाज ऐकू आला होता आणि

पावसाचा प्रत्येक थेंब पडल्यावर ‘ॐ नमः शिवाय’चा ध्वनी ऐकू येत होता. मी आश्चर्यचकित झालो, मला जाणवले की, हा सत्संग सर्वाधिक विशेष आणि असामान्य होता.

नंतर, त्याच संध्याकाळी केंद्राच्या कोऑर्डिनेटरने फोन करून सांगितले की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. सुरुवातीला मी खूप उदास झालो. पण नंतर जेव्हा मी चिंतन केले, तेव्हा लक्षात आले की, बाबांनी त्याच वेळेच्या आसपास महासमाधी घेतली होती, जेव्हा आमचा सत्संग सुरू होता. आम्ही सर्वांनी त्यांच्या उपस्थितीचा अतिशय शक्तिशाली रूपाने अनुभव घेतला होता आणि मी बाबांच्या अपार करुणेसाठी त्यांच्याप्रति अत्यंत कृतज्ञता अनुभवली.

*लंडन, यूनायटेड किंगडम*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या रात्री मी झोपले होते, मधुर स्वप्ने पाहत होते. त्याचवेळी माझ्यासमोर एक सोनेरी त्रिकोण उद्भवला. त्या त्रिकोणाच्या आत, सुंदर सोनेरी पादुका, श्रीगुरूंच्या पादुका होत्या.

मी हे दृश्य पाहून भावुक होत असतानाच माझ्या फोनची रिंग वाजली. इच्छा नसतानाही मी स्वप्नातून जागी झाले आणि फोन उचलला. माझ्या मैत्रिणीने सांगितले की, बाबांनी काही तासांपूर्वीच गुरुदेव सिद्धपीठात महासमाधी घेतली आहे. मी स्तब्ध झाले आणि ही गोष्ट मला खोलवर स्पर्शून गेली की, जाण्याआधी बाबा मला उपहार देऊन गेले आहेत. त्यांनी जाताजाता स्वतःला माझ्या अंतरी स्थापित केले होते आणि स्वप्नातील तो दृष्टान्त याच गोष्टीचे प्रतीक होता.

मी जाणते की, बाबा सदैव आपल्यासोबत आहेत.

*न्यूयॉर्क, अमेरिका*

वर्ष १९८२मध्ये, मी सिद्धयोग मार्गावर नवीन साधक होते आणि गुरुदेव सिद्धपीठात सेवा अर्पण करत होते. बाबांनी महासमाधी घेण्याच्या काही दिवस आधी मी जेव्हाजेव्हा डोळे बंद करत असे, तेव्हा मला त्यांच्या मुखकमलाचे दर्शन होत असे. त्या शनिवारी दुपारी, शेवटच्या वेळी बाबांच्या भौतिक रूपातील दर्शनादरम्यान मी हॉलच्या मागील बाजूस डोळे बंद करून बसले होते, तेव्हा मी माझ्या अंतरी त्यांचे दर्शन घेतले. अशा प्रकारे अंतरी त्यांच्या सान्निध्यात असल्यामुळे मी पूर्णपणे संतुष्टतेचा अनुभव घेत होते.

त्यावेळी मी व्हिडिओ तंत्रज्ञाच्या रूपात अन्य सेवाकर्त्यांसह सेवा अर्पण करत होते आणि त्याच रात्री बाबांनी महासमाधी घेतल्यानंतर माझी सेवा होती, जेव्हाही आवश्यकता असेल, तेव्हा व्हिडिओची उपकरणे उपलब्ध करून देणे. मी जेव्हा तत्परतेने हे कार्य करत होते, तेव्हा माझ्या अंतरी अतीव आनंद उदित होऊ लागला; हे अविश्वसनीय होते. माझ्या मनात विचार आला आणि मी स्वतःलाच म्हणाले, “थांब, तू तर उदास असायला हवे. बाबांनी आत्ताच देहत्याग केला आहे!” याउलट, तत्काळ माझ्या आतून ही समज उद्‌भवली की, बाबा शरीर नाहीत. ते माझ्यासमवेत आहेत. त्यांचे प्रेम व उपस्थिती माझ्या अंतरी विद्यमान आहे.

*कॅलिफोर्निया, अमेरिका*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या संध्याकाळी मी माझ्या घरून मेलबर्न स्थित सिद्धयोग आश्रमात सेवा अर्पण करण्यासाठी जात होते. रस्त्यावर चालताचालता माझी दृष्टी चंद्रावर पडली. तो अविश्वसनीयरीत्या सुंदर दिसत होता. मी चंद्राला प्रार्थना करू लागले—यापूर्वी मी कधीही अशी प्रार्थना केली नव्हती. मी प्रार्थना केली, “हे चंद्रा, काही तासातच तू गुरुदेव सिद्धपीठाचा गुरुचौक प्रकाशमय करशील. माझी प्रार्थना आहे की, तू माझ्या बाबांची काळजी घे.”

नंतर मला या योगायोगाचे आश्चर्य वाटले. दुसऱ्या दिवशी, श्रीगुरुगीतेच्या पठणानंतर आम्हाला सांगण्यात आले की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. मग आम्हाला ‘ॐ नमो भगवते मुक्तानंदाय’ची धून सुरू करण्यास सांगण्यात आले. मी जो तंबोरा वाजवत होते, त्याला मी छातीशी धरले, मग हार्मोनियम वादकाने मला हार्मोनियम वाजवण्यास सांगितले. मला माहीत नव्हते की, मी

किती वेळ वाजवेन, पण त्यामुळे आता काहीही फरक पडत नव्हता. मी स्वतःला धन्य समजत होते की, अशा मंगलमय समयी मी बाबांची व त्यांच्या भक्तांची सेवा करू शकत होते.

चौदा दिवसांच्या सप्ताहादरम्यान मला ज्या गहन आनंदाचा व माधुर्याचा अनुभव आला तो असाधारण होता. मला कोणतीही खिन्नता किंवा उदासी जाणवली नाही. केवळ एक सुंदर, सुमधुर आनंद ज्याने मला त्याच्या प्रेमपूर्ण आलिंगनात सामावून ठेवले, जो माझ्या अंतरी अधिकाधिक गहन होत गेला आणि मला रूपांतरित करत राहिला.

*ऑकलंड, न्यूझीलंड*

वर्ष १९८२च्या ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस मी मॅसेचुसेट्स्‌च्या केंब्रिज शहरात राहत होते. एके दिवशी फिरायला गेलेली असताना मला माझ्या अंतरी स्पष्टपणे ‘ॐ नमः शिवाय’ मंत्र ऐकू येऊ लागला. त्या वेळी मी माझ्या जीवनातील एक मुख्य निर्णय घेण्याचा प्रयत्न करत होते. मी काही काळासाठी बोस्टनच्या सिद्धयोग आश्रमात राहण्याचा निर्णय घेतला.

आश्रमात येऊन एक आठवडादेखील झाला नव्हता की, आम्ही बाबांच्या महासमाधी घेण्याविषयीची बातमी ऐकली. मला वाटले की, जणू काही बाबांनीच मला आश्रमात बोलावले आहे. मी माझ्या मनाला संकीर्तनात व ध्यानात निमग्न केले. मला बाबांच्या खूप निकट असल्याचे जाणवत होते. संकीर्तनाच्या समयी मी अनुभवले की, जन्मोजन्मीची दुःखे तसेच यातना माझ्या अंतःकरणातून धुवून निघत आहेत, बाहेर पडत आहेत. मी जवळजवळ सहा महिने तिथे राहिले.

मला जाणवते की, तेव्हापासून बाबाच माझ्या जीवनाला मार्गदर्शन करत आहेत. मी माझ्याविषयी असलेले त्यांचे प्रेम अनुभवते.

*मॅसेचुसेट्स्, अमेरिका*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या दिवशी माझ्या कॉलेजच्या परिसरात पानगळीचा एक मनोहर व शानदार दिवस होता. सूर्याची किरणे झाडांमधून जणू लपाछपीचा खेळ खेळत होती आणि सारा परिसर जवळजवळ रिकामा होता, कारण सर्व लोक फुटबॉलचा खेळ पाहण्यासाठी गेले होते. माझी मैत्रीण व मी हिरव्यागार मैदानावर बसून त्या सुंदरतेचा व शांतीचा आनंद उपभोगत होतो आणि मी माझ्या मैत्रिणीला खूप आनंदाने बाबांविषयी सांगत होते. दोन विद्यार्थी आमच्यापाशी आले. मी त्यांना अभिवादन केले व आमच्याजवळ बसवले आणि त्यांनादेखील बाबांविषयी सांगू लागले!

बाबांविषयी इतक्या गोष्टी बोलल्यानंतर मी त्या दिवशी संध्याकाळी स्थानिक सिद्धयोग ध्यानकेंद्रात सत्संगाला जाण्याचे ठरवले. मी ज्यावेळी तिथे पोहोचले, तेव्हा पाहिले की संकीर्तन आधीपासूनच सुरू होते. मी विचारले की, मला उशीर झाला आहे का; सूत्रधाराने सांगितले की, “अरे, तू ऐकले नाहीस का? आज बाबांनी देहत्याग केला आहे.”

मला वाटले की, त्या दिवशी संध्याकाळी बाबांनी स्वतःच मला तिथे खेचून नेले होते, कारण सहसा मी आठवड्याच्या त्या दिवशी सत्संगासाठी जात नाही. मी गहन कृतज्ञतेने भरून गेले की, बाबांच्या प्रेमाने अशा प्रकारे माझी काळजी घेतली.

*कॅलिफोर्निया, अमेरिका*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या रात्री मी एका पार्टीमध्ये होतो. मी बाहेर बाल्कनीत जाऊन सुंदर चंद्र पाहिला. मला माझ्या अंतरी तीव्रतेने बाबांची आठवण आली आणि एक तीव्र उत्कंठा उद्‌भवली की, मी भारतात जाऊन बाबांच्या सान्निध्यात राहावे. ती उत्कंठा इतकी तीव्र होती की, माझ्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. मी पार्टी सोडून घरी निघून गेलो.

त्या रात्री मी स्वप्नात स्वतःला गुरुदेव सिद्धपीठात बाबांसोबत पाहिले. स्वप्नात आम्ही एकमेकांना आलिंगन देत होतो. मग मी झोपेतून जागा झालो, मी प्रेमाने आकंठ भरून गेलो होतो.

सकाळी फोनची रिंग वाजली. कोणीतरी सांगितले की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. त्वरित मला माझे स्वप्न आठवले आणि मी समजून चुकलो की, बाबांचे प्रेम आता आणखी अधिक प्रबळतेने वाढत राहील.

*फेलेन, जर्मनी*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या दिवशी मला फोनवर सांगितले गेले की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. आश्चर्याची गोष्ट ही घडली की, दुःख अनुभवण्याऐवजी मला इतक्या आनंदाची अनुभूती होऊ लागली की, मी उठून नृत्य करू लागलो. मी गोल-गोल फिरू लागलो, मी स्वतःला थांबवूच शकत नव्हतो. मला बाहेर जायला संकोच वाटत होता, कारण मी हे जाणत होतो की, मी माझा आनंद लपवू शकणार नाही आणि रस्त्यावरच नाचू लागेन! म्हणून मी घरातच राहिलो आणि बाबांच्या अवर्णनीय आनंदात संपूर्ण दिवस प्रेमाने नाचत राहिलो.

मला अत्यंत प्रबळतेने बाबांची उपस्थिती जाणवत होती.

*फ्लोरिडा, अमेरिका*

बाबांच्या महासमाधीची बातमी ऐकून मला फार मोठा धक्का बसला. मी त्वरित बोस्टनच्या सिद्धयोग आश्रमात जायला निघाले. मला वाटले की, स्वतःचे संतुलन मिळवण्यासाठी माझ्यापाशी एकच मार्ग आहे, तो म्हणजे सत्संगात असणे आणि 'ॐ नमो भगवते मुक्तानंदाय'चे संकीर्तन करणे. आम्ही आश्रमाच्या अत्यंत शक्तिपूरित वातावरणात एक आठवडा संकीर्तन केले.

मी सहा वर्षांपूर्वी बाबांना भेटले होते आणि मला असे वाटत असे की, श्रीगुरूंचे भौतिक रूपच मला माझ्या हृदयाशी जोडते. परंतु त्या आठवड्यात संकीर्तन करताकरता माझ्या हे लक्षात येऊ लागले की, कदाचित अजूनही असे काहीतरी आहे जे मला शिकायचे आहे.

अनेक दिवस माझे अश्रू वाहत राहिले; त्या अश्रूंनी तसेच बाबांच्या कृपेने व प्रेमाने मी हे शिकले की, बाबा जरी त्यांचे शरीर सोडून गेले असले, तरीही आत्म्याचा कधीही मृत्यू होत नाही. आता बाबा सदैव माझ्या हृदयात माझ्यासोबत राहतात.

*मॅसेचुसेट्स्, अमेरिका*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या दिवशी माझी एक प्रिय मैत्रीण जी सिद्धयोगी होती, तिने मला तिच्या नव्या घराच्या गृहप्रवेशाच्या कार्यक्रमाला भोजनासाठी आमंत्रित केले होते. घरात कोणतेही फर्निचर नसल्यामुळे आम्ही खाली जमिनीवर बसून 'पिकनिक' केली. माझी मैत्रीण सुगरण आहे. प्रत्येक नवीन पदार्थ वाढताना ती म्हणत असे, "बाबांना हा पदार्थ अशाच प्रकारे बनवलेला आवडतो," किंवा "बाबा अशा तऱ्हेनेच भेंडीची भाजी बनवतात."

मी उत्तर दिले, "मला खात्री आहे की, तू हे जेवण बाबांसाठी बनवले आहेस आणि मला आनंद वाटतो की, त्यांच्या वतीने मी ते खाणार आहे."

त्याच दिवशी संध्याकाळी आम्ही ऐकले की, रात्री बाबांनी महासमाधी घेतली आहे. आम्हाला असे वाटले की, बाबांचे महाप्रयाण  आणि ब्रह्मलीन होण्याच्या त्यांच्या जन्मोजन्मीच्या लक्ष्याच्या सन्मानाप्रीत्यर्थ आम्ही दुपारी त्या भोजनाचा आनंद घेतला होता. तथापि बाबांनी "हे जग सोडले नाही." निश्चितच ते तेव्हापासून माझ्या जीवनाला मार्गदर्शन करत आले आहेत, बहुधा त्या शब्दांच्या माध्यमातून जे झोपेतून उठताना किंवा ध्यानातून उठताना माझ्या मनात प्रतिध्वनीत होतात.

*लिटिलहॅम्पटन, यूनायटेड किंगडम*

वर्ष १९८२मध्ये मी सिद्धयोग मार्गावर नवीन होते. मी जितके वाचन करता येईल तितके करत असे आणि स्थानिक सिद्धयोग केंद्रात जाऊन संकीर्तन करत असे. मी बाबांना व्यक्तिगतरीत्या जरी कधीही भेटले नव्हते, तरीही जेव्हा एका सिद्धयोग स्वामींनी आमच्या परिसरात येऊन एक विशेष कार्यक्रम आयोजित केला, तेव्हा मला मंत्राद्वारे शक्तिपात दीक्षा प्राप्त झाली होती.

ज्या दिवशी बाबा मुक्तानंदांनी महासमाधी घेतली. त्या दिवशी मी माझ्या ध्यानकक्षात बसले होते. मी ध्यान करण्याचा प्रयत्न करत होते, पण मी रडणे आणि बाबांच्या फोटोसमोर नमन करणे यांव्यतिरिक्त काहीही करू शकत नव्हते. हे सर्वकाही स्वाभाविकपणे, आपोआपच घडत होते. त्या दिवशी संध्याकाळी संकीर्तनासाठी ध्यानकेंद्रात आल्यावर मला समजले की, बाबांनी देहत्याग केला आहे. त्या दिवशी जेव्हा मी ध्यानकक्षात बसले होते, तेव्हा माझ्या अंतरी काहीतरी होते, जे ही गोष्ट जाणत होते.

*जॉर्जिया, अमेरिका*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या रात्री मी गुरुदेव सिद्धपीठात होते. त्या दिवशी दुपारी आम्ही गुरुचौकात मौन दर्शन घेतले आणि रात्री झोपायला जाण्याआधी एक व्हिडिओ पाहिला. रात्री ११ वाजल्यानंतर काही वेळाने मला अचानक कसला तरी स्पर्श झाल्यासारखे जाणवले, ज्यामुळे मी झोपेतून जागी झाले आणि बिछान्यावर उठून बसले. त्यानंतर मी झोपू शकले नाही. नंतर पहाटेच्या सुमारास, आणखी एका संगीत सेवाकर्त्यासमवेत मी भगवान नित्यानंद मंदिरात गेले आणि हार्मोनियम काढला, कारण मी संगीत विभागात सेवा अर्पण करत होते. आम्ही संकीर्तन करण्याचा निर्णय घेतला.

मी ‘ॐ नमो भगवते मुक्तानंदाय’ची धून वाजवू लागले आणि आम्ही मंदिरात संकीर्तन सुरू केले. नंतर संकीर्तन गुरुचौकात सुरू केले गेले आणि ते दिवसेंदिवस अधिकाधिक भावपूर्ण व रसपूर्ण होत

गेले. ते संकीर्तन, एक महिन्याच्या सप्ताहात बदलले, कारण त्या समयी हजारो लोक बाबांच्या अंतिम दर्शनासाठी आश्रमात येत होते.

मला आठवते की, त्या संकीर्तनाने आमच्यापैकी अनेक भक्तांना बाबांच्या प्रेमतरंगांसमवेत वाहून नेले आणि आम्हाला आमच्या हृदयात आणून तिथेच स्थिर केले—जे बाबांनी ना कधी सोडले आणि ना कधी सोडतील. आम्ही जसजसे आमच्या परमप्रिय बाबांच्या सुंदर स्वरूपाविना पहिला महिना व्यतीत करत होतो, तसतसा त्यांच्या शक्तीचा वेग अधिक प्रबळ होत गेला व त्या शक्तीच्या उपस्थितीची जाणीव इतकी वाढत गेली की, मी याआधी कधीही तसे अनुभवले नव्हते; मला समजले की, खरे तर हे आहे की, बाबा कुठेही गेलेले नाहीत.

*कॅलिफोर्निया, अमेरिका*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या दिवशी, जेव्हा बाबांनी महासमाधी घेतली, तेव्हा मी सिडनीच्या सिद्धयोग आश्रमात राहत होते. या बातमीने मी खूप दुःखी झाले, कारण मला असे वाटले की, मी माझ्या श्रीगुरूंना गमावले आहे.

आम्ही दररोज, 'ॐ नमो भगवते मुक्तानंदाय'ची धून गात होतो. तिसऱ्या दिवशी रात्री मी पहाटे ३ वाजता उठले. सर्वत्र शांतता होती आणि सर्वजण झोपलेले होते. अचानक माझे हृदय वेगाने धडधडू लागले. मला वाटले की, "बाबा इथे आहेत!" माझ्या शरीरातील शक्तीची स्पंदने खूपच प्रबळ होती.

मग मी बाबांचा आवाज ऐकला. मी माझ्या हृदयात बाबांच्या आवाजाला अक्षरशः प्रकंपित होताना अनुभवत होते. ते हिंदीत बोलत होते. मी स्वागताचा तो वाक्यांश ओळखला, जो ते सदैव त्यांच्या प्रवचनाच्या सुरुवातीला बोलत असत, जसे आता गुरुमाई बोलतात, "अत्यंत प्रेमाने आणि अत्यंत सन्मानाने सर्वांचे हार्दिक स्वागत." हे शब्द काही वेळ प्रतिध्वनीत होताना ऐकू आले आणि मग बंद झाले. मी जाणले की, नुकतेच मला बाबांचे दर्शन झाले आहे.

अनेक वर्षांनंतर मला समजले की, बाबांची शक्ती अनुभवण्याचा आणि त्यांचा आवाज ओळखण्याचा हा अनुभव श्रीगुरूंचा सूक्ष्म रूपात माझ्या हृदयात प्रवेश करण्याचा अनुभव होता. जसे की, शास्त्रग्रंथांमध्ये शिकवले जाते, मी माझ्या श्रीगुरूंना गमावेन, हे सर्वस्वी अशक्य आहे.

*कॅसलमेन, ऑस्ट्रेलिया*

शुक्रवार, १ ऑक्टोबर, १९८२च्या संध्याकाळी काही कामानिमित्त बाहेर जाण्यासाठी मी दरवाजा उघडताच, पौर्णिमेच्या चंद्राची भव्यता आणि दीप्ती पाहून मी अचंबित होऊन गेले. मी आतापावेतो इतका विशाल आणि इतका आकर्षक व चमकदार चंद्र कधीही पाहिला नव्हता. तो आकाशाच्या खालच्या बाजूला क्षितिजाकडे स्थिर होता आणि त्याचा केशरी रंग चंद्राऐवजी अस्त होणाऱ्या सूर्यासमान वाटत होता.

मी खरोखर जमिनीवर बसले आणि त्याला प्रणाम केला. मी प्रणाम करण्याविषयी विचार केला नव्हता; ते अनायास, बस आपोआप घडले.

गाडी चालवताना माझे हृदय प्रेमाने व आनंदाने ओसंडून वाहत होते. ते प्रकट करण्याचा एकच मार्ग माझ्या अंतरी उद्‌भवला, तो म्हणजे चंद्राविषयी मला जे गाणे माहिती होते ते गाऊन; “Shine On, Harvest Moon,” [पीक कापणीच्या वेळी उदित होणाऱ्या हे चंद्रा, तुझ्या पूर्ण तेजस्वितेसह चमकत राहा] आणि गाडी चालवताना पूर्ण वेळ मी ते गात राहिले.

दुसऱ्या दिवशी २ ऑक्टोबरच्या सकाळी माझ्या फोनची रिंग वाजली आणि मला सांगण्यात आले की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. मला त्वरित समजले की, काल रात्री झालेले चंद्राचे दर्शन या अविस्मरणीय घटनेचे प्रतीक होते.

*न्यूयॉर्क, अमेरिका*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेला मी गुरुदेव सिद्धपीठात राहत होते. मी जेव्हा ऐकले की बाबांनी महासमाधी घेतली आहे, तेव्हा माझा विश्वासच बसला नाही. पण जेव्हा मी ध्यानकक्षाकडे गेले, जे आता समाधीमंदिर आहे, तेव्हा मी लोकांना ती जागा तयार करताना पाहिले. तेव्हा माझा या वस्तुस्थितीवर विश्वास बसला की, बाबांनी देहत्याग केला आहे.

कालपरत्वे, जसजशी मी या वास्तविकतेचा स्वीकार करत गेले की, बाबांचे मनोहर व आनंदमय भौतिक स्वरूप आता या धरतीवर कृपेचा वर्षाव करण्यासाठी विद्यमान नाही, तसतशी एक कोमल तसेच प्रेमपूर्ण भावना माझ्या हृदयाला व्याप्त करू लागली. माझा ठाम विश्वास बसला की, हा भाव म्हणजे माझ्या अंतरी असलेली बाबांची उपस्थितीच आहे. त्या वेळी मला उमजले की, बाबा माझ्यासोबत आहेत आणि सदैव राहतील.

*सॉन फेलीपे, मेक्सिको*

मी सर्वप्रथम बाबा मुक्तानंदांना वर्ष १९७६च्या हिवाळ्यात गुरुदेव सिद्धपीठात भेटलो होतो.

२ ऑक्टोबर १९८२च्या पौर्णिमेच्या रात्री मी सौदी अरेबियामध्ये काम करत होतो. खुरियास गॅस फील्डमध्ये चालत असताना माझ्यासमोर एक दृश्य तरळले आणि ते पाहून मी रस्त्यातच थबकलो. मी पाहिले की, बाबा बिछान्यात निजले आहेत आणि सिद्धयोगाचे स्वामीगण त्यांच्या आजूबाजूला उभे आहेत. मला जाणवले की, मीदेखील त्यांच्यासमवेत तिथे उपस्थित आहे आणि मला माहीत होते की, हा बाबांच्या महाप्रयाणाचा समय आहे. माझ्या लक्षात आले की, जरी त्यांनी देहत्याग केलेला असला, तरीदेखील बाबा वास्तवात जे आहेत, ते तत्त्व सदासर्वदा आपल्यासमवेत आहे.

*लूइझियाना, अमेरिका*

वर्ष १९८१-१९८२मध्ये, गुरुदेव सिद्धपीठात जवळजवळ एक वर्ष बाबांच्या सान्निध्यात व्यतीत केल्यानंतर मी कॉलेजचा अभ्यास पूर्ण करण्यासाठी मेनमध्ये माझ्या घरी परतलो. २ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या दिवशी मी खडकांवर बसून अटलांटिक महासागराकडे पाहत होतो. मी नुकताच श्रीगुरुगीतेचा पाठ संपवला होता आणि किनाऱ्यावर आदळणाऱ्या लाटा मी पाहत होतो, तेव्हाच श्रद्धायुक्त आदर, आश्चर्य, प्रेम व कृतज्ञता यांनी मिश्रित एका प्रबळ भावनेने मला वेढून टाकले. मी अनुभवू लागलो की, मी आजूबाजूच्या प्रत्येक गोष्टीशी पूर्णपणे एकाकार आहे.

घरी पोहोचल्यावर बातमी मिळाली की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. हे ऐकून मी माझे हृदय विस्तृत होताना अनुभवले. जरी असा विचार करून की, मला बाबांच्या भौतिक स्वरूपाचे आता कधीही दर्शन होणार नाही, मी उदास होतो आणि माझ्या डोळ्यांत अश्रू येत होते, तरीदेखील मी हेदेखील जाणत होतो की, मला मार्गदर्शन करण्यासाठी व माझे संरक्षण करण्यासाठी ते सदैव उपस्थित राहतील. आणि मला हे स्पष्टपणे समजले की, त्यांनी त्यांच्या आशीर्वादांचा संपूर्ण महासागर आधीच परमप्रिय गुरुमाईंच्या सुपुर्द केला होता आणि ते विश्वाला आणखी एका महान सिद्धाचे मार्गदर्शन, करुणा व प्रेम प्रदान केल्याशिवाय जाणार नाहीत.

*हवाई, अमेरिका*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या संध्याकाळी मी सोफ्यावर बसून बाबा मुक्तानंदांचे एक पुस्तक वाचत होते आणि सिद्धयोग संकीर्तनाची टेप ऐकत होते. मी खिडकीच्या बाहेर पाहिले आणि चंद्र माझ्या दृष्टीस पडला. माझ्या हृदयात प्रेमाचा तसेच आनंदाचा अद्‌भुत भाव जागृत झाला.

त्यानंतर, फोनची रिंग वाजली, तेव्हा मला समजले की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. मला वाटले की, हे साधारण त्याच वेळी घडले असावे, जेव्हा मी चंद्राकडे पाहत होते आणि माझ्या हृदयात उचंबळून येणारा अपार आनंद अनुभवत होते.

*मॅल्मो, स्वीडन*

ऑक्टोबर १९८२मध्ये मी माझ्या पतीसमवेत ओकलंड, कॅलिफोर्नियामध्ये राहत होते. एके दिवशी ध्यानाच्या वेळी मला खोलीमध्ये प्रबळतेने बाबांच्या उपस्थितीची अनुभूती झाली; मी त्यांच्याप्रतिच्या प्रेमभावाने भारावून गेले. माझ्या हृदयात झालेल्या या शक्तिशाली दर्शनाच्या अनुभवाने मी रडू लागले, मी हुंदके देत रडत होते. माझे पती खोलीमध्ये आले आणि त्यांनी विचारले, "काय झाले?"

मी कसेबसे सांगितले, "काही नाही! बाबा इथेच आहेत!"

दुसऱ्या दिवशी सकाळी मला समजले की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. नंतर मला त्यांच्या महाप्रयाणाची नेमकी वेळ कळली—ही तीच वेळ होती जेव्हा मी माझ्या अंतरी उचंबळून येणारे त्यांचे शाश्वत, पूर्ण प्रेम अनुभवले होते.

या क्षणी व प्रत्येक क्षणी त्यांची जी अनंत कृपा माझ्यावर कायम असते, तिच्यासाठी मी सदैव त्यांची कृतज्ञ असेन; माझी कृतज्ञता शब्दांमध्ये व्यक्त करण्यापलीकडे आहे.

*वॉशिंग्टन, अमेरिका*

२ ऑक्टोबर, १९८३ला स्थानिक सिद्धयोग संकीर्तन व ध्यानकेंद्रात आम्ही बाबांच्या महासमाधीची प्रथम पुण्यतिथी साजरी केली. नंतर, त्याच महिन्यात महासमाधीची चांद्र पुण्यतिथी आली, पण मला आठवण राहिली नाही.

त्या रात्री जेव्हा मी बिछान्यावर पडले होते व अर्धवट जागृतावस्थेत होते, तेव्हा मी माझ्या डोक्याच्या अगदी वर एक झगमगता श्वेत प्रकाश पाहिला. त्या श्वेत प्रकाशाने एका प्रचंड प्रवाहाप्रमाणे

माझ्या डोक्यात प्रवेश केला आणि माझ्या छातीमधून वर माझ्या हातांमध्ये प्रवाहित होऊ लागला; त्याच्या शक्तीने माझे हात वर उचलले गेले.

मग एकदम स्पष्टपणे बाबा माझ्यासमोर प्रकट झाले, जसे ते गुरुदेव सिद्धपीठात समाधीमंदिराच्या भिंतीवर लावलेल्या फोटोत दिसतात—जो फोटो मी अजूनही पाहिलेला नव्हता. मी त्वरित जाणले की, आज कोणता दिवस आहे. मी माझ्या पूजास्थानी गेले आणि त्यांना प्रणाम केला—मी कृतज्ञ होते की, माझ्या श्रीगुरूंनी माझी आठवण ठेवली आहे.

त्या अनुभवाने माझी श्रीगुरूंशी असलेल्या माझ्या संबंधाविषयी, त्यांच्या महानतेविषयी आणि या मार्गाच्या सत्यतेविषयी खात्री पटली.

*इलिनॉए, अमेरिका*

२ ऑक्टोबर १९८२च्या पौर्णिमेच्या सायंकाळी, माझी वाग्दत्त वधू आणि मी न्यूयॉर्कच्या हडसन नदीच्या खोऱ्यातील एक दिवसाची सहल संपवून गाडीने न्यूयॉर्क शहरात परतत होतो. पानझडीच्या मोसमातील ती सुंदर अशी जादुई संध्याकाळ होती. आम्ही गाडीतून जेव्हा जात होतो, तेव्हा आम्ही दोन टेकड्यांच्या मधून जात असतानाच मी चंद्रोदय होताना पाहिला.

तो सर्वाधिक पूर्ण, देदीप्यमान, उज्ज्वल, तेजोमय चंद्रमा होता, जो त्याच्या खालच्या तसेच वरच्या मेघांनादेखील प्रकाशमान करत, त्यांना जणू चमकणारी एक झालरच बहाल करत होता. मी अचंबित होऊन, आश्चर्याने पाहतच राहिलो. रस्त्याच्या कडेला असलेल्या पायवाटेवर आपल्या गाड्या उभ्या करून लोक गाडीतून बाहेर पडून हे जादुई दृश्य न्याहळत होते. आश्चर्याने मी विचार केला, "आजपर्यंत मी असे काही बघितलेच नव्हते, की ज्याचे सौंदर्य इतके परिपूर्ण आहे."

तासाभरातच, आम्ही मॅनहटन येथील सिद्धयोग आश्रमात पोहोचलो जिथे आम्हाला समजले की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. मला धक्काच बसला. तरीदेखील, रस्त्यावरील प्रवासात मी जे दृश्य पाहिले होते, त्याचे स्मरण करून मी माझ्या अंतरी व्यापकतेचा व विस्ताराचा अनुभवदेखील घेतला. मला हे समजले की, बाबांच्या ब्रह्मलीन होण्याचा अर्थ असा आहे की, ते वास्तवात

प्रत्येकाशी एकाकार झाले आहेत. रात्रीचे आकाशदेखील त्यांच्या दिव्य चेतनेच्या प्रकाशाला प्रतिबिंबित करत होते.

*ओहायो, अमेरिका*

२ ऑक्टोबर १९८२ रोजी सकाळी, मेलबर्न येथील सिद्धयोग आश्रमामध्ये आयोजित केलेल्या शक्तिपात ध्यानशिबीरात भाग घेण्यासाठी मी तयारी करत होतो, त्याच वेळी माझ्या पत्नीला फोन आला. शांतपणे माझ्याजवळ येऊन तिने मला सांगितले की, आश्रमातून एका सेवाकर्त्याने फोन करून सांगितले आहे की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. ध्यानशिबीर होणार नाही, आणि त्याऐवजी आपण बाबांचे नामसंकीर्तन करणार आहोत.

मी बाबांच्या महासमाधीची बातमी ऐकताच एक आश्चर्यजनक गोष्ट घडली : प्रेमाचा एक अखंड प्रवाह माझ्या अंतरी वाहू लागला, मी रोमांचित झालो. यापूर्वी कधीही मी अशा अद्‌भुत अवस्थेचा अनुभव घेतला नव्हता, त्यामुळे निःशब्द होऊन मी माझ्या पत्नीकडे पाहतच राहिलो.

त्यानंतर आम्हा दोघांना आठवले की, बाबांनी सांगितले होते की, ते जेव्हा त्यांचे शरीर सोडून जातील, तेव्हा ते सर्वत्र त्यांच्या भक्तांच्या हृदयात सामावून जातील. मला जाणवले की, त्या वेळी माझ्या बाबतीत अगदी तसेच घडत होते.

नंतर, आम्ही पहिल्यांदा जेव्हा ‘ॐ नमो भगवते मुक्तानंदाय’चे संकीर्तन केले, तेव्हा अश्रूचा एक थेंब माझ्या डोळ्यांतून ओघळला. हा अश्रू आनंदाचा होता. मी विचार केला, शोक करण्याचे कारणच काय? बाबा तर कायमचेच माझ्या हृदयामध्ये सामावले आहेत.

*नॉर्थ कॅरोलिना, अमेरिका*

शनिवारी दुपारी मी एका वडाच्या झाडाखाली उभा होतो, तेव्हा मी पाहिले की, बाबा तिथूनच त्यांच्या गोल्फ कारमधून जात आहेत. मला माझ्या आजूबाजूच्या प्रत्येक गोष्टीमध्ये, वृक्षांमध्ये, पानांमध्ये, धूळीमध्ये त्यांचा चेहरा दिसू लागला.

त्या रात्री माझ्या तोंडात रेंगाळणाऱ्या मधुर स्वादाच्या जाणीवेने मी झोपेतून जागा झालो. माझे संपूर्ण शरीर अतीव आनंदाने ओतप्रोत झाले होते आणि माझ्या मस्तकाच्या वरील भागामध्ये तीव्र स्पंदने होत होती. मला बाबांच्या उपस्थितीचा व त्यांच्या प्रेमाचा अतिशय प्रबळतेने अनुभव होत होता. दुसऱ्या दिवशी सकाळी माझ्या लक्षात आले की, ज्यावेळी बाबांनी महासमाधी घेतली, अगदी त्याच वेळी रात्री मला अचानक जाग आली होती.

*कुरेनावाका, मेक्सिको*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या दिवशी, मी ध्यान करत होते आणि पहिल्यांदाच मी गहन स्थिरतेच्या, प्रशांतीच्या तसेच आनंदाच्या स्थानी प्रवेश केला. मला प्रेमाने वेढून टाकले आहे असे मी अनुभवत होते. असे वाटत होते की, मी असे काहीतरी प्राप्त केले आहे की, ते विद्यमान आहे हे मला सदैव ठाऊक होते, पण त्याचा संपूर्ण अनुभव मी आजपर्यंत घेतला नव्हता, असे काहीतरी की, जे खोलवर परिचित जरी असले, तरीदेखील विस्मयजनकपणे अगदी नवीन होते. मी विचार केला, “ओह, तर हे आहे ध्यान.” मी जेव्हा डोळे उघडले, तेव्हा मला ऊर्जेने पूरित तसेच खोलवर ताजेतवाने झाल्यासारखे वाटत होते, जणू काही सखोलतेने माझे शुद्धीकरण झाले असावे. आश्चर्याने भारावलेल्या स्थितीत हे सर्व सांगण्यासाठी मी जेव्हा माझ्या पतीकडे गेले—तेव्हा त्यांनी सांगितले की, आत्ताच त्यांना समजले आहे की, बाबांनी महासमाधी घेतली आहे.

कसे काय कोण जाणे, पण मी हे जाणले होते की, मी बाबांच्या शक्तीचा प्रत्यक्ष अनुभव घेतला होता, मग भले ही मी भारतापासून खूप दूर पाश्चिमात्य देशात जरी राहत असले, तरीही. बाबांच्या कृपेने मला माझ्या अंतरात्म्याचा गहन अनुभव आला होता. या अनुभवाने माझे सारे जीवन बदलून टाकले. त्या दिवसापासून मी नियमितपणे ध्यान करते आहे आणि ध्यान माझ्या जीवनाचा आधार बनले आहे. त्याने मला अंतर्निहित दृढतेशी व स्थिरतेशी जोडले आहे.

*वेल्स, यूनायटेड किंगडम*

सँटा मोनिका आश्रमाच्या ध्यानकक्षामध्ये शांती पसरली होती. केवळ 'ॐ नमो भगवते नित्यानंदाय'च्या संकीर्तनाचे मृदू स्वर वातावरणात प्रवाहित होत होते. खिन्नतेचा तसेच गहन प्रेमाचा मिश्रित असा भाव प्रबळतेने माझ्या अंतरी व्याप्त झाला होता. जमिनीवर बसून मी ती शाल पांघरली, जी मी ध्यानाच्या समयी पांघरत असे.

मी जेव्हा धून गाऊ लागले, तेव्हा मला बाबांचे त्यांच्या श्रीगुरूंप्रति असलेले प्रेम आठवले, ज्यांच्या नामाचे संकीर्तन आम्ही करत होतो. माझ्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. माझे हृदय प्रेमाने भरले होते. रात्री एका क्षणी, जणू काही एखादा अचूक संकेत मिळाल्याप्रमाणे, सर्व भक्त एकाच वेळी कोमलतेने, 'ॐ नमो भगवते मुक्तानंदाय' गाऊ लागले. रात्र जसजशी वाढत गेली, तसतशी धून अधिक गतिमान होत गेली, आणखी अधिक गहन होत गेली आणि अखेरीस ती पूर्ण उत्साहाने, प्रेमाने तसेच शांतीने परिपूर्ण अशा आनंदमय संकीर्तनात बदलली. बाबा आमच्या हृदयात होते, आम्ही जे गात होतो, त्याच्या प्रत्येक अक्षरासह ते आम्हाला आनंदाने भरून टाकत होते, आमचा उद्धार करत होते. बाबांच्या प्रेमाने परिपूर्ण, त्यांच्या कृपेने परिपूर्ण, त्यांचे शब्द माझ्या मनात परत तरंगू लागले : "मी तुला कधीच सोडणार नाही." महोत्सव साजरा करण्याचे हे सगळ्यात मोठे कारण होते.

*फ्लोरिडा, अमेरिका*

बाबांच्या महासमाधीची बातमी मला मिळताच, मी लगेच बाबांच्या समाधीमंदिरात जाण्यासाठी आणि श्रीगुरुमाईंचे दर्शन घेण्यासाठी गुरुदेव सिद्धपीठाकडे जाण्यास निघाले. मला अशी आशा होती की, बाबा माझ्यासमोर प्रकट होतील, परंतु आश्रमातील बगिच्यांमध्ये खूप शोधूनही ते प्रकट झाले नाहीत.

त्यानंतर मला माझ्या पतीचे एक पत्र मिळाले की, माझा नऊ वर्षाचा मुलगा आजारी आहे आणि मी तिथे नसल्यामुळे माझी आई त्याची देखभाल करण्यास त्यांची मदत करते आहे. त्यांनी सांगितले की, माझ्या मुलाबरोबर माझी आई जेव्हा बोलत होती, तेव्हा अचानक माझ्या मुलाच्या चेहेऱ्यावर बाबांचा चेहरा दिसू लागला. काहीसे भारावून जात ती दुसरीकडे पाहू लागली. तीन वेळा तिने दुसरीकडे पाहिले आणि प्रत्येक वेळी परत वळून पाहिले असता तिला बाबांचा चेहरा दिसला; त्यानंतर हळूहळू हा दृष्टान्त अस्पष्ट होत गेला. माझ्या आईने माझ्या पतीला तिच्या या अद्भुत दृष्टान्ताविषयी सांगितले आणि माझ्या पतीच्या अध्ययन कक्षात ठेवलेल्या बाबांच्या फोटोकडे निर्देश करत ती म्हणाली, "पण बाबांच्या कपाळावर लाल टिळा लावलेला नव्हता."

त्यानंतर आम्हाला समजले की, देहत्यागाच्या काही दिवस आधी बाबांनी कपाळावर टिळा लावणे सोडून दिले होते. बाबा प्रकट निश्चितच झाले—जिथे त्यांची खरोखर आवश्यकता होती तिथे. माझ्या आईला आशीर्वाद मिळाला होता आणि माझी प्रबळ इच्छा पूर्ण झाली होती.

*नॉर्थ कॅरोलिना, अमेरिका*

१९८२च्या पानगळीच्या मोसमात मी ग्रीसमधील पॅटमॉस आयलंडमध्ये होते, तिथे गेल्यावर एका आठवड्यानंतर, २ ऑक्टोबरच्या पौर्णिमेच्या रात्री, मी घाबरून झोपेतून जागी झाले. काही दिवसांनी, अथेन्स येथील एका हॉटेलमध्ये थांबलेली असताना मी बाबांचा एक फोटो भिंतीवर लावला आणि इंग्रजी वर्तमानपत्र विकत घेतले. काही वेळानंतर त्या वर्तमानपत्रावर माझी नजर पडली—तेव्हा ते वर्तमानपत्र खाली पडले होते आणि त्याचे नेमके तेच पान उघडे होते ज्यावर शोकसंदेश होता. त्या पानावरील एका छोट्या परिच्छेदावर माझी नजर पडली जो बाबांच्या देहत्यागाविषयीचा होता.

मला धक्काच बसला, परंतु स्वतःला शांत ठेवण्यासाठी मी माझे स्वाध्यायचे पुस्तक काढले आणि बाबांच्या फोटोसमोर अश्रूपूरित डोळ्यांनी श्रीगुरुगीतेचा पाठ करू लागले. मला तत्काळ शांतीचे, सुखाचे तसेच क्षेमखुशालीचे भाव जाणवू लागले. दुसऱ्या दिवशी मी जेव्हा अथेन्स येथील

बाजारपेठेत फिरत होते, तेव्हा मला लोकांच्या चेहेऱ्यांमध्ये, घरांच्या दर्शनी भागांमध्ये, झाडांमध्ये बाबांचा चेहरा दिसला—बाबा प्रत्येक स्थानी होते आणि हे विश्व केवळ प्रेमच होते.

*कॅलिफोर्निया, अमेरिका*

सिद्धयोग मार्गाचे अनुसरण करण्याच्या काही वर्षे आधी १९८२मध्ये, एके दिवशी मी माझ्या खोलीत पहुडले होते आणि मौन रूपाने ॐ चा जप करत होते. या स्वराचा जप मला गहन ध्यानात घेऊन गेला. ध्यानातून बाहेर आल्यावर आणि डोळे उघडल्यावर माझ्या हृदयातून एक तेजोमय सोनेरी प्रकाश बाहेर पडत होता आणि माझ्या संपूर्ण शरीराच्या चहूबाजूला व्याप्त झाला होता. मी ज्या-ज्या वस्तूला स्पर्श करत होते, ती सोनेरी प्रकाशाने व्याप्त होऊन त्या प्रकाशाने वेढली जात होती : माझी पुस्तके, वह्या, पेन, कपडे, खुर्ची—सर्वकाही! नंतर तो प्रकाश पूर्ण खोलीभर पसरला आणि मला आनंदाने पूरित करून व मी भारमुक्त झाल्याची जाणीव करवून हळूहळू कमी होत गेला.

वर्ष १९८९मध्ये, मी माझी सिद्धयोग साधना सुरू केली. त्यानंतर मी एक पुस्तक वाचले, ज्यामध्ये बाबांनी समजावले होते की, श्रीगुरू जेव्हा महासमाधी घेतात, तेव्हा ते आपल्या शिष्यांमध्ये प्रवेश करतात. ध्यानाचे माझे जर्नल पुन्हा एकदा वाचल्यावर मला आढळून आले की, काही वर्षांपूर्वी मला सोनेरी प्रकाशाचा जो अनुभव आला होता तो २ ऑक्टोबर १९८२लाच आला होता—तोच दिवस जेव्हा बाबांनी महासमाधी घेतली होती.

मी बाबांप्रति अत्यंत कृतज्ञ आहे की, त्या दिवशी ते प्रकाश रूपाने माझ्यामध्ये सामावले आणि काही वर्षांनंतर त्यांनी मला श्रीगुरुमाईंकडे आणले.

*फोर्ट-दी-फ्रान्स, मार्टिनिक*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या दिवशी मी माझ्या शहरातील घरातून माझ्या गावातील घरी जायला निघालो होतो. त्या दिवशी दुपारी मी जेव्हा निसर्गाच्या सान्निध्यात फिरतफिरत जात होतो, तेव्हा छोट्या-छोट्या पक्ष्यांचा एक थवा घिरट्या घालत आणि किलबिलाट करत माझ्या डोक्यावर गोलगोल फिरू लागला. मी उत्स्फूर्तपणे ‘ॐ नमो भगवते मुक्तानंदाय’ गाऊ लागलो. त्याच दिवशी मी पूर्ण चंद्र पाहिला, तो खूपच तेजस्वी होता; त्याला पाहून मला बाबांची आठवण झाली. नंतर मी झोपी गेलो.

मध्यरात्री अचानक मला जोराचा आवाज ऐकू आला. मला असे वाटत होते की, तो आवाज माझ्या आतूनच येतो आहे. बाबांचा तो आवाज मी ओळखला, ते ‘ॐ नमः शिवाय’चा जप करत होते. मी अचंबित होऊन उभा राहिलो. त्यानंतर मला ऐकू आले की, बाबा मला सांगत होते, “तुला जेव्हा माझ्यासोबत राहावेसे वाटेल, तेव्हा तू फक्त माझ्या नामाचा जप कर ”

शहरात परत आल्यावर, मला माझ्या एका मित्राची चिठ्ठी मिळाली, ज्यात लिहिले होते, “बाबांनी महासमाधी घेतली आहे.” तेव्हा मला आदल्या रात्री आलेल्या अनुभवाचे महत्त्व लक्षात आले आणि हेदेखील लक्षात आले की, प्रेमापोटी आणि करुणेपोटी त्यांनी मला या शक्तिशाली व अभूतपूर्व घटनेसाठी तयार केले होते.

मी बाबांप्रति अत्यंत कृतज्ञ आहे, माझ्या हृदयात त्यांच्या शाश्वत उपस्थितीची सर्वाधिक अनमोल भेट मला देण्यासाठी.

*श्री मुक्तानंद आश्रमातील एक स्टाफ सदस्य*

ऑक्टोबर १९८२मध्ये, एके दिवशी मी जेव्हा आपल्या घरी परत आले, तेव्हा मी पाहिले की, मला प्रिय असलेला बाबांचा फोटो खाली जमिनीवर पडला आहे. नीट पाहिल्यावर मला आनंद झाला की, त्याची केवळ काचच फुटली होती, माझ्या सद्भाग्याने फोटो एकदम ठीक होता.

नंतर मला तारेद्वारे बातमी मिळाली की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. मला जाणवले की, बाबांनी मोठ्या प्रेमाने मला हे दाखवून दिले की, त्यांचे केवळ बाहेरील आवरणच गेले आहे आणि ते आतादेखील पूर्णपणे उपस्थित आहेत.

*कॅरन्स, ऑस्ट्रेलिया*

२ ऑक्टोबर, १९८२च्या सकाळी मी गुरुदेव सिद्धपीठातील एक डॉर्मिटरीच्या जिन्यावरून उतरत होतो, मला जाणवू लागले की, वातावरणामध्ये एक प्रकारची विचित्र अशी शांती होती. मी कार्यालयांच्या दिशेला गेलो, तेव्हा आश्रमाचे एक प्रबंधक बाहेर आले आणि त्यांनी सांगितले की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. हे वास्तव जेव्हा माझ्या लक्षात आले, तेव्हा माझे मन एकदम स्तब्ध झाले. मला वाटले की, कदाचित मला रडू कोसळणार आहे म्हणून मी हॉलला लागून असलेल्या एका पडद्यामागे गेलो. मी जेव्हा तेथे जाऊन उभा राहिलो, तेव्हा आश्चर्य याचे वाटले की, खिन्नतेचा लवलेशही मला जाणवत नव्हता. त्याउलट, माझ्या अंतरी आनंदाच्या लहरी उसळत होत्या. मला बाबांची उपस्थिती इतक्या तीव्रतेने जाणवत होती की, की तशी उपस्थिती त्याआधी मला कधीच जाणवली नव्हती. मला उमगले की, बाबा माझ्या हृदयात आहेत—आणि कायम राहतील, आणि हेदेखील की, मी कुठेही जरी असलो, तरी त्यांची कृपा माझ्यापर्यंत पोहोचू शकते.

*न्यू जर्सी, अमेरिका*

ऑक्टोबर, १९८२मध्ये मी एका वर्षासाठी कॉलेजमधून सुटी घेतली होती, कारण मला खिन्नता जाणवत होती आणि माझ्या आत्म्यापासून व जीवनाच्या उद्देशापासून मी दूर झालो आहे असे वाटू लागले होते. मी इतर काही विद्यार्थ्यांसह एकाच घरात राहत होतो आणि माझ्या एका मित्राची एक छोटीशी ध्यानाची खोली होती ज्यामध्ये बाबांचा एक फोटोदेखील होता. एके दिवशी मी त्याच्या

त्या छोट्याशा खोलीत बसलो, दिवा लावला आणि पहिल्यांदाच ध्यान करण्याचा प्रयत्न केला. खाली बसून मी जेव्हा बाबांच्या फोटोकडे पाहिले, तेव्हा मला माझ्या अंतरी एक अशी स्थिरता आणि प्रेम अनुभवास येऊ लागले की, जसे मी यापूर्वी कधीच अनुभवले नव्हते. बाबांच्या डोळ्यांत पाहता-पाहता मला असे वाटू लागले की, जणू काही माझे विचार तसेच माझी अस्वस्थता विलीन होते आहे.

काही दिवसांनंतर पहिल्यांदाच मी माझ्या मित्रासमवेत स्थानिक सिद्धयोग ध्यानकेंद्रात गेलो. तेथील संगीत, नामसंकीर्तन तसेच बाबांच्या प्रवचनाचा व्हिडिओ मला अतिशय आवडला. परंतु तेथील लोक एकमेकांचे सांत्वन करीत होते, कारण बाबांनी काही दिवस आधी महासमाधी घेतली होती; खरे तर, ज्या दिवशी त्यांनी देहत्याग केला होता, तो तोच दिवस होता जेव्हा बाबांचा फोटो मी माझ्या मित्राच्या खोलीत पाहिला होता आणि प्रथमच ध्यान केले होते.

त्या दिवसापासून मी सिद्धयोग मार्गावरील माझी वाटचाल सुरू केली. बाबा, तुम्हाला खूप-खूप धन्यवाद, मला मार्गदर्शन करण्यासाठी आणि तुमच्या प्रेमासाठी.

*मेरीलँड, अमेरिका*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या रात्री माझी आजी, गुरुदेव सिद्धपीठामध्ये होती. तिने या शब्दांत तिचा अनुभव मला सांगितला :

मला फारच उदास वाटत होते. मला बाबांशी बोलावेसे वाटत होते, पण बाबा तर आता नव्हते. त्या रात्री मी याच गहन दुःखद भावनेसह झोपी गेले. मध्यरात्रीच्या सुमारास, मला बाबांचा कोमल स्पर्श जाणवला, मला जाग यावी म्हणून ते प्रेमाने मला हलवत होते. बाबांनी विचारले, “तुला माझ्याशी बोलायचे होते ना. बोल, तुला काय सांगायचे आहे? मी इथे आहे” मी उत्तर दिले, “आता तुम्ही आला आहात आणि मला दर्शन दिलेत, याहून अधिक मला काय हवे? माझ्यापाशी सर्वकाही आहे.”

मी पुन्हापुन्हा गुरुमाईंना आणि बाबांना माझा प्रणाम अर्पण करते.

*डोंबीवली, भारत*

वर्ष १९८१च्या उन्हाळ्यात श्री मुक्तानंद आश्रमातील तो आमचा अंतिम दिवस होता आणि आमच्या सर्वात मोठ्या मुलाला बाबागाडीतून फिरवण्यासाठी मी हॉलच्या बाहेर उभा होतो, त्याच वेळी बाबा तिथून चलले होते. बाबा अत्यंत उत्साहपूर्ण होते आणि त्यांच्या संपूर्ण अस्तित्वातून आनंदाचे तेज प्रसरित होत होते. परंतु मला माझ्या अंतरी खोलवर असे वाटत होते की, बाबांच्या भौतिक रूपातील दर्शनाची कदाचित ही माझी शेवटचीच वेळ आहे. मला अचानक रडू कोसळले.

३ ऑक्टोबर १९८२ला मी माझ्या मुलाकडे पाहत होतो, तो जमिनीवर बसून कागदावर चित्र काढत होता. फोन वाजला. तो एका सिद्धयोग्याचा होता, ज्याने बातमी दिली की, बाबांनी कालच देहत्याग केला आहे. माझे हृदय बाबांच्या उपस्थितीने भरून गेले, आणि मी जाणत होतो की, ते तिथे माझ्यासोबत आहेत, माझ्यामध्ये आहेत आणि माझ्या स्वतःच्या प्रेमाच्या रूपात आहेत.

त्या क्षणापासून माझा या गोष्टीवर पूर्ण विश्वास बसला की, श्रीगुरू माझ्यासोबत आहेत आणि मी त्यांना माझ्या हृदयात केव्हाही भेटू शकतो. या दृढ विश्वासाने मला एक गृहस्थ असण्याच्या जबाबदाऱ्या पार पाडत असताना, सेवायुक्त जीवन जगण्यासाठी व माझ्या साधनेमध्ये स्थिर राहण्यासाठी आधार दिला आहे.

धन्यवाद, गुरुमाई आणि धन्यवाद बाबा, खऱ्या अर्थाने एक परिपूर्ण जीवन जगण्याची चावी मला प्रदान करण्यासाठी.

*टोरोंटो, कॅनडा*

मी १९७९मध्ये बाबांना भेटले आणि त्यांच्या तिसऱ्या विश्वयात्रेदरम्यान तसेच नंतर १९८२मध्ये गुरुदेव सिद्धपीठ येथे बाबांनी महासमाधी घेईपर्यंत मी सेवा अर्पण केली. यादरम्यान मी बाबांची

प्रवचने ऐकत असे ज्यांमध्ये दररोज सायंकाळी सत्संगामधून तसेच शक्तिपात ध्यानशिबीरांमधून ते अंतरात्म्याविषयी मोठ्या सुंदरतेने समजावून सांगत असत. परंतु मला असे वाटत नव्हते की, बाबा ज्याविषयी समजावून सांगत आहेत त्याची अनुभूती मला होते आहे. बाबांच्या महासमाधीच्या दिवशी सकाळी, गुरुमाईंनी एक प्रवचन दिले ज्यामध्ये त्यांनी सांगितले की, बाबांनी आत्ताच आपल्या हृदयात प्रवेश केला आहे. त्या क्षणी मी अनुभवले की, माझ्या हृदयात शक्तीची एक मधुर हालचाल होऊ लागली आहे, जिला मी बाबांच्या उपस्थितीच्या रूपात ओळखले. हा माझा अनुभव माझ्यासमवेत सदैव राहिला आहे.

*कॅलिफोर्निया, अमेरिका*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या दिवशी, मी गुरुदेव सिद्धपीठातील गुरुचौकात होतो. आपण बाबांसोबत असावे अशी तीव्र उत्कंठा मला अचानक जाणवू लागली. अगदी त्याच वेळी, एक सुंदर लाल व निळ्या रंगाचे फुलपाखरू माझ्या गुडघ्यावर येऊन बसले आणि मला माझ्या अंतरी ऐकू आले, “हे शरीर क्षणभंगुर आहे; आत्मा अमर आहे” मला वाटू लागले की, आत्म्यात विलीन झालेले बाबा, सर्वत्र आहेत आणि ते सदैव माझ्यासोबत आहेत. ही समज प्राप्त झाल्यामुळे माझी दृढता वृद्धिंगत झाली आणि त्यामुळे माझ्या अंतर-प्रेमात वृद्धी झाली.

*रोडज़्, फ्रान्स*

१ ऑक्टोबर, १९८२च्या रात्री माझे आईवडील व मी बाहेर फिरत होतो, तेव्हा माझ्या आईने वर आकाशात चमकणाऱ्या चंद्राला पाहिले आणि हर्षभरित होऊन ती म्हणाली, “पाहा पाहा! चंद्रबिंबात बाबांचा चेहरा दिसतो आहे! तो बाबांचा चेहरा आहे!" तिचे आनंदित हास्य प्रतिध्वनीत होऊ लागले आणि आम्ही सर्वदेखील हसू लागलो.

दुसऱ्या दिवशी मी सत्संगासाठी मियामीच्या सिद्धयोग ध्यानकेंद्रात गेले. तिथे पोहोचल्यावर मी पाहिले की, बाहेर बरेच लोक उभे आहेत. काय घडते आहे हे मला माहीत नव्हते, परंतु जेव्हा बातमी देण्यात आली की, बाबांनी महासमाधी घेतली आहे, तेव्हा मला वाटले की, माझे हात आभाळाकडे उंचावत आहेत आणि माझे डोळे अश्रूंनी भरून आले आहेत. मला जाणवले की, माझ्या अंतरातील बाबांचा आवाज ऐकून मी खूप हसते आहे, ते म्हणत होते, “मी माझे नामच बनलो आहे! मी माझे नामच बनलो आहे! मी माझे नामच बनलो आहे : मुक्तीचा आनंद बनलो आहे!”

*न्यू मेक्सिको, अमेरिका*

१९८२मध्ये मी व माझी मैत्रीण, मेलबर्न येथील आश्रमात ध्यानाच्या एका कोर्समध्ये भाग घेणार होतो. मला आंतरिक शांतीचा अनुभव घ्यायचा होता म्हणून मला ध्यान करणे शिकायचे होते. मग ऑक्टोबरमध्ये एके दिवशी मला माझ्या मैत्रिणीने फोन करून कळवले की, तो कोर्स होणार नाही कारण स्वामी मुक्तानंदांनी महासमाधी घेतली आहे.

मी जे ठरवले होते, ती माझी योजना पूर्ण होत नाही हे पाहून मी खूप काळजीत पडले आणि अस्वस्थ झाले होते. मी माझ्या खोलीत फिरताना माझ्याशीच बोलू लागले, “हे मुक्तानंद बाबा, खरोखरच मला या कोर्समध्ये भाग घ्यायचा होता!” असे मी अनेकदा म्हणाले आणि शेवटी तर पाय आपटत, हे शब्द उंच स्वरात आणि त्राग्याने माझ्या मुखातून बाहेर पडले. त्या क्षणी, मला जोराने टाळ्या वाजवल्याचा आवाज ऐकू आला आणि सुखासनाच्या मुद्रेत बसलेला एक योगी माझ्या भृकुटीच्या मध्यात प्रकट झाला. अशा तऱ्हेने मला शक्तिपात दीक्षा प्राप्त झाली.

*न्यूयॉर्क, यूनायटेड स्टेटस्*

२ ऑक्टोबर, १९८२च्या पौर्णिमेच्या रात्री मी काश्मीरमधील दऱ्याखोऱ्यांमध्ये कॅम्पिंगसाठी [शिबीर] गेले होते. त्या रात्री पहिल्यांदा मी एवढा विशाल व तेजस्वी चंद्र पाहिला. तो पाहून मी आश्चर्यचकित झाले. मला वाटले की, या चंद्राने माझी गहन इच्छा पूर्ण करण्याचे वचन त्याच्यापाशी बाळगले आहे. त्या रात्री मला ब्रह्मांडाशी एकत्वाचा भाव जाणवला, मला झोप आली नाही.

त्या वेळी मी बाबा मुक्तानंदांना ओळखत नव्हते. पण पाच वर्षांनंतर, मी जेव्हा सिद्धयोग मार्गाची विद्यार्थी झाले, तेव्हा मला समजले की, २ ऑक्टोबर १९८२च्या रात्री बाबांनी महासमाधी घेतली होती.

अनेकदा मी त्या पूर्ण प्रशांत रात्रीचे स्मरण करत ध्यान करते—जी आता भूतकाळातील एक क्षण राहिला नसून, समयातीत क्षण आहे जेव्हा बाबा माझ्यासोबत होते; ते त्या वेळी माझ्यासोबत होते जेव्हा मला माहीतदेखील नव्हते की, या धरतीवर त्यांचे भौतिक अस्तित्व आहे.

*कॅलिफोर्निया, अमेरिका*

१९८२च्या पानगळीच्या मोसमात मी श्री मुक्तानंद आश्रमात सेवा अर्पित करत होतो. एके दिवशी संध्याकाळच्या भोजनानंतर, मी विचार केला की, मी जरा मोकळ्या हवेत बाहेर जावे. मी एकटा होतो आणि फिरतफिरत आश्रमाजवळील टेकडीच्या दिशेने जाऊ लागलो, जिथून आश्रम दिसतो. मी तिथे बसलेलो असतानाच मला एका अद्‌भुत अशा प्रेमयुक्त शक्तीचे तरंग एका पाठोपाठ एक उसळत आहेत असे पुन्हापुन्हा वाटू लागले; मी ओळखले की, हे बाबाच आहेत. हा अनुभव वाढतच गेला आणि मी अशा एका अवस्थेत लीन झालो की, जिथे मला जाणवू लागले, की बाबा खरोखरच माझ्यावर खूप प्रेम करतात. त्या रात्री चंद्र विशेषत्वाने विशाल, परिपूर्ण होता आणि अत्यंत तेजयुक्त होता.

अखेर मी परत आश्रमाकडे निघालो. अचानक मला असे वाटू लागले की, अशी एखादी गोष्ट आहे, जी मला वेगळीच जाणवते आहे. नंतर मला समजले की, बाबांनी महासमाधी घेतली आहे. ही बातमी जरी अत्यंत दुखःदायी होती, तरीही माझा तो अनुभव मला निरंतर शक्तीने भरून टाकत

होता. मला माहीत होते की, बाबा अजूनही माझ्यासोबत आहेत आणि मी कधीही माझ्या अंतरी त्यांच्या उपस्थितीमध्ये कोणताच अडथळा असल्याचे अनुभवले नाही. या अनुभवाने मला पूर्णपणे साहाय्य केले आहे.

*कॅलिफोर्निया, अमेरिका*

© २०२२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.